| लातूर | वर्ष ३४ वे | अंक ३०० वा | सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठ ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांत दिवंगत अजितदादा पवारांचा शोकप्रस्ताव

## अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मुख्यमंत्र्यांचे भावनिक भाषण

**मुंबई/प्रतिनिधी : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे मोठी पोकळी निर्माण झाली असून ती भरून काढणे शक्य नाही आणि दादांसारखा नेता पुन्हा होणे नाही, अशी खंतही देवेंद्र फडणवीसांनी सोमवारी व्यक्त केली. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अजित पवारांच्या शोकप्रस्तावात ते बोलत होते.**



### अजित पवार कठोर निर्णय घ्यायचे

अधिवेशनाच्या काळात सर्वांत आधी अजित पवार विधानभवनात यायचे. नेहमीच खुर्चीत दादा दिसायचे. सभागृह कितीही काळ चालले तर दादा आपल्याजागी बसलेले पाहायला मिळायचे. आज ते आपल्यात नाहीत ही निश्चितपणे खंत आहे. यावर्षी दादांनी बारावे अर्थसंकल्प मांडला असता. पुढच्या वर्षी १३ वा अर्थसंकल्प मांडून बॅरिस्टर शेषराव यांच्याबरोबर बरोबरी केली असती. कदाचित त्या नंतरच्या कालावधीत सर्वाधिक अर्थसंकल्प मांडणारे नेते म्हणून दादांकडे पाहिले असत. पण त्याआधीच दादा गेले. यावेळी अर्थसंकल्प मांडण्याची जबाबदारी माझ्यावर आली. अर्थसंकल्पाच्या संदर्भात आपल्या सर्वांनाच कल्पना आहे की, कठोर निर्णय घ्यायचे असतील तर ते घ्यायला कधीही मागेपुढे पाहणारे अजित दादा होते. पण त्याचवेळी वित्तविभागाने लाडकी बहीण योजनेचा भार हा अर्थसंकल्पावर फार मोठ्या प्रमाणात पडेल, म्हणून याचा पुनर्विचार करावा असे सुचवल्यावरही अजित पवारांनी ठामपणे निर्णय घेऊन लाडकी बहीण योजना सुरू केली, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

लाडकी बहीण योजनेनंतर अजित पवारांनी गुलाबी जॅकेट घालायला सुरुवात केली होती. त्यामुळे आम्हालाही गुलाबी जॅकेट घालायला लावले होते. आता या गोष्टी फक्त आठवणीत आहेत. खरंतर अशाप्रकारचा प्रस्ताव मांडणं घटनात्मक जबाबदारी आहे. पण मला असं वाटतं की माझ्याकरता अत्यंत भावनिक प्रसंग आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### अजित पवारांची पोकळी कधीच भरून निघणार नाही

यावेळी त्यांनी महाकवी भास यांच्या स्वप्नवासवदत्तम् या नाटकातील एक पंक्ती वाचून दाखवली. अजित पवारांचा असा मृत्यू होणं हे खरं म्हणजे राजकीय हानी नाही तर सर्वांच्याच अंत्यकरणाला प्रचंड वेदना देणारी बाब आहे. काही गोष्टींवर काळ हे औषध असतं. पण कितीही काळ गेला तरी काही वेदना कमी होत नाहीत. अशाप्रकारची ही वेदना असणार आहे. अनेकवेळा राजकीय नेत्यांच्या निधनानंतर पोकळी निर्माण झाली असं विधान करतो. ज्येष्ठ नेता निघून गेल्यानंतर त्यावेळी त्यांच्या निधनाने त्यांची कमतरता जाणवते. पण ज्यावेळी अजित दादांसारखा व्यक्ती निघून जातो, तेव्हा पोकळी निर्माण झाली या शब्दाची व्याप्ती लक्षात येते. कारण, अशाप्रकारचे अजित दादा होऊ शकत नाही. त्यामुळे ही पोकळी भरून काढणं कठीण आहे. त्यामुळे त्यांचे अकस्मात निधन एक धक्काच आहे, अशा भावना फडणवीसांनी व्यक्त केल्या.

कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यू ही विश्रांती ही प्रेरणादायी काव्यपंक्तीही त्यांनी अजित दादांना स्मरून सभागृहात मांडली. प्रत्येक क्षणाचा नीट उपयोग करणारे अजित दादा, नियोजन करणारे अजित दादा असे नेते राजकारणात विरळ पाहायला मिळतात. आमचा दोघांचाही जन्म २२ जुलैचा. ते ११ वर्षे मोठे होते. खऱ्या अर्थाने ते माझे दादा होते. आमची एक दशकापेक्षा जास्त काळ अतिशय जवळीक होती. अतिशय चांगली मैत्री होती. १९९९ साली दादांची ओळख झाली. पण २०१४ नंतर भावनिक नातं दादांशी तयार झालं. राष्ट्रवादी काँग्रेस स्ट्रॅटेजिक पार्टनर आहे असं म्हणत असताना अजित दादांकडे भावनिक दृष्टीकोनातून पाहिलं, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### २०१९ साली काय झालं?

अनेकांचा आधारवड असलेले, धीर देणारे, निर्णयाचे ताकद असलेले दादा आता नसल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. अजित पवार हे शब्दाला जागणारा नेता होते. २०१९ साली आम्ही त्याचा अनुभव घेतला. २०१९ ला सरकार स्थापनेचं ठरलं. पण त्यांच्या वरिष्ठांनी निर्णय बदलला. पण त्यांनी मला शब्द दिला होता, त्यामुळे त्यांनी शब्द मोडणार नसल्याचा निर्णय घेतला. तेव्हा अनेकांनी त्याला पहाटेचा शपथविधी म्हटलं. पण तेव्हा अजितदादा नाराज होत. कारण पहाट म्हणजे ६. आम्ही ९ वाजता शपथविधी घेतला होता. अजित पवारांना त्याची किंमत मोजावी लागली असेल. पण ज्यावेळी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आमच्या विरोधात गेला, आम्ही दोघंही वर्षा बंगल्यावर होतो. आमच्याविरोधात निर्णय गेल्यानंतर सरकार स्थापन करणं शक्य नव्हतं. तेव्हा मी त्यांना त्यांचा निर्णय घ्यायला सांगितला. कारण, त्यांच्यासोबत जे लोक होते, त्यांचंही भविष्य आपल्याला पाहायचं आहे. त्यानंतर जे सरकार आलं त्यांच्यासोबत जाण्याचा निर्णय दादांना घेतला, अशी आठवण देवेंद्र फडणवीसांनी सांगितली.

## अजित पवार उत्तम मुख्यमंत्री बनले असते

खरे म्हणजे दादांसदर्भात अनेक गोष्टी सांगता येतील. दादा अतिशय वक्तशीर होते. पण दादांनी पहिल्यांदा टायमिंग चुकवलं. खूप मोठी इनिंग दादा खेळतील, हे सर्वांना दिसत होते. अशा परिस्थितीत पहिल्यांदा टायमिंग चुकवेल. दादा सहावेळा उपमुख्यमंत्री झाले. सर्वाधिकवेळा उपमुख्यमंत्री होण्याचा मान त्यांना मिळाला. अनेकवेळा ते म्हणायचे, मी कधीतरी मुख्यमंत्री होईन, पण उपमुख्यमंत्री म्हणून मी कायम राहीन. पण मी इथे म्हणतो की, अजित दादा पवार वॉज दि बेस्ट चिफ मिनिस्टर जो महाराष्ट्राला कधीच मिळाला नाही. तर, कोणत्याही मुख्यमंत्र्याला अर्थमंत्री कसा पाहिजे तर अजितदादांसारखा पाहिजे, असंही फडणवीसांनी म्हटलं.

जनसेवेचे बांधून कंकण, त्रिभुवन सारे घेई जिंकून, अर्पुन आपुले हृदयसिंहासन नित् भजतो मानवतेला जो आवडे सर्वांना तोचि आवडे देवाला, या काव्यपंक्तीने देवेंद्र फडणवीसांनी अजित पवारांच्या कार्याचा गौरव केला.

## माजी रेल्वे मंत्री, तृणमूल काँग्रेसचे संस्थापक मुकुल रॉय यांचे निधन

**कोलकाता:** माजी रेल्वे मंत्री आणि तृणमूल काँग्रेसचे संस्थापक सदस्य मुकुल रॉय यांचे वयाच्या ६९ व्या वर्षी निधन झाले. मुकुल रॉय यांचे (२३ फेब्रुवारी) पहाटे दीड वाजता वाजता कोलकातामधील अपोलो रुग्णालयात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते गेल्या काही वर्षांपासून स्मृतिभ्रंश आणि इतर अनेक आरोग्य समस्यांशी झुंज देत होते. निधनापूर्वी काही दिवस ते कोमात होते. त्यांना अन्ननलिकेद्वारे द्रव आहार दिला जात होता.

## प्रभात किरणे

**चित्तामध्ये भेदभाव,काय करील देव चित्तात वासना,कैसे असे शुद्ध भाव नित्यनंदी योगी,करीती सत्य आचरण आनंद तिथे,जी जाती सत्याला शरण**

**– इंजि. नागनाथ कलवले, लातूर**

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**IDFC फर्स्ट बँकेत रु.५९० कोटींचा घोटाळा..**

## चिमटा दयाचा



**लातूरचे पोलीस ॲक्शन मोडवर दिसत आहेत ! गाड्याच्या काळ्या काचा व प्रखर लाईटींगकडे कडक कारवाईची गरज आहे !!**

# सकल धनगर समाजाच्या वतीने नवनिर्वाचित सदस्यांचा नागरी सत्कार



**निलंगा/प्रतिनिधी :** नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत धनगर समाजाचे निवडून आलेल्या नवनिर्वाचित सदस्यांचा निलंगा तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने भव्य दिव्य नागरी सत्कार करण्यात आला.

निलंगा तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील निवडून आलेल्या नवनिर्वाचित सदस्यांचा सत्काराचा कार्यक्रम निलंगा येथील शासकीय विश्रामग्रहावर आयोजित करण्यात आला होता. यावेळी निलंगा नगरपरिषद सदस्य सौ. राधिका मल्हारी पेठकर, स्वीकृत न.प. सदस्य प्रा. डॉ. गजेंद्र मधुकर तरंगे, कोकळगाव गणाचे पं. स. सदस्य सौ. जयश्री रत्नादीप घोडके, चिंचोली (स.) गणाचे पं.स. सदस्य सौ.सिंधू ग्यानबा हजारे, कासार सिरसी गणाचे पं. स. सदस्य विवेक भाऊराव कोकणे या नवनिर्वाचित सदस्यांचा सकल धनगर समाजाच्या वतीने सन्मानचिन्ह शाल श्रीफळ देऊन भव्य नागरी सत्कार करण्यात आला. तसेच नगरपरिषद निवडणुकीत सौ. संगीता म्हेत्रे व वलांडी जि.प. गटातून निवडणुकीत सूर्यकांत भोसले यांनी निवडणूक रिंगणात उतरून रनांग गाजवले पण त्यांना प्रभावाचा सामना करावा लागला पुढील काळात पुन्हा जोमाने व उत्साहाने काम करावे यासाठी प्रोत्साहन म्हणून त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष म्हणून डॉ. गिरीधर सूर्यवंशी तर प्रमुख म्हणून समाजाचे समाज भूषण ॲड गुंडेराव बनसोडे, व प्रमुख पाहुणे म्हणून चंदर मामा गोजरटे, सूर्यकांत भोसले, लक्ष्मण होळकर, दिनकर बिरादार आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी अनेक मान्यवारांनी आपले मनोगत व्यक्त करून नवनिर्वाचित सदस्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याच व्यासपीठावर नियोजित असलेल्या कासार सिरसी तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने मदनसुरी येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक सूर्यवंशी यांनी नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश सराटे यांनी केले, तर सामाजिक कार्यकर्ते तथा संपादक झाटिंग अण्णा म्हेत्रे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी डॉ. सचिन अभंगे, नामदेव काळे, डॉ. बापूराव काळे यांच्यासह अनेक समाज बांधवांनी उपस्थित होते.

# निलंगा येथे २४ फेब्रुवारीला पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

## नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर आणि निलंगा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता निलंगा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे पार पडणार आहे.





या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित आस्थापना आणि उद्योजक सहभागी होणारं असून, त्यामुळे जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

मेळाव्यात दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा तसेच इतर कोणत्याही शैक्षणिक पात्रतेचे उमेदवार सहभागी होऊ शकतात. विविध क्षेत्रांतील पदांसाठी मुलाखती घेतल्या जाणार आहेत. तरी इच्छुक उमेदवारांनी २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता निलंगा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे. मुलाखतीसाठी शैक्षणिक प्रमाणपत्रे, स्वतःचा रिझ्युमे, बायोडाटा, पासपोर्ट आकाराचे फोटो (किमान पाच प्रती) इत्यादी सोबत आणावेत, असे आवाहन लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

# 'ऑपरेशन ऑल आऊट' अंतर्गत लातूर शहरात कडक नाकाबंदी

## वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर पोलिसांची कारवाई



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री लातूर जिल्हा पोलिसांकडून शहरात 'ऑपरेशन ऑल आऊट' अंतर्गत विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान शहरातील विविध ठिकाणी अचानक नाकेबंदी, वाहन तपासणी, संशयितांची चौकशी तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

ही मोहीम पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शहरातील गांधी चौक, शिवाजीनगर, विवेकानंद चौक व एमआयडीसी या चारही पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच वेळी नाकेबंदी व तपासणी मोहीम राबविण्यात आली. ऑपरेशन ऑल आऊट' अंतर्गत नाकेबंदी दरम्यान हुल्लडबाजी करत वाहन चालवणे, ट्रिपल सीट मोटारसायकल चालवणे, विनापरवाना वाहन चालवणे तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान एकूण २२ प्रकरणे नोंदवून सुमारे ३५,०००/- रुपयांचा दंड आकारण्यात करण्यात आला.

पोलीस स्टेशन एमआयडीसी हद्दीत देखील व्यापक वाहन तपासणी मोहीम राबविण्यात आली. या कारवाईदरम्यान एकूण २८ वाहनांवर कारवाई करण्यात आली. १७,४००/- रुपये दंड आकारण्यात करण्यात आला. तसेच फटाका सायलेन्सर लावलेल्या तीन बुलेट मोटारसायकली व ट्रिपल सीट चालविणारी तीन वाहने पुढील कारवाईसाठी पोलीस स्टेशन येथे डिटेन करण्यात आले असून पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीत नाकाबंदी दरम्यान २८ वाहणावर कार्यवाही करूण २४,००० रू दंड आकारण्यात आला व पोलीस ठाणे विवेकानंद चौक यांनी मोटर वाहन कायद्यान्वये आठ केसेस करून ५५०० दंड आकारला तसेच अवैधपणे शस्त्र घेऊन फिरणाऱ्या विरुद्ध शस्त्र अधिनियम प्रमाणे एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोहीमेअंतर्गत शहरातील प्रमुख चौक, वर्दळीचे रस्ते तसेच शहराच्या प्रवेशद्वारांवर कडक नाकेबंदी करण्यात आली. संशयास्पद हालचाली करणाऱ्या व्यक्तींची तपासणी करण्यात आली. रेकॉर्डवरील गुन्हेगार तसेच तडीपार आरोपींवर विशेष लक्ष ठेवण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही ट्युशन परिसरात गस्त वाढविण्यात आली. वाहतूक नियमांचे पालन व्हावे यासाठी मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांची तपासणी तसेच नियमबाह्य बदल केलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

लातूर जिल्हा पोलीस नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सतत प्रयत्नशील असून भविष्यातही अशा प्रकारच्या अचानक नाकेबंदी, गस्त व विशेष मोहिमा राबविण्यात येणार आहेत. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे तसेच संशयास्पद बाबींची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## सगळच मोफत देणे म्हणजे.. आळशी बनविणे

न्यायालयाने सर्वात महत्त्वपुर्ण मत व्यक्त करताना म्हणाले की, सगळच मोफत मिळाल्यास लोक काम का करतील? आता हा विचार सरकारने करून यावर अमलबजावणी करणे अपेक्षित आहे. वास्तविक कोणाला मोफत द्यावे व कोणाला नाही या बाबत एक सुत्र असणे आवश्यक आहे. आलिकडे मतासाठी जवळपास सर्वच राजकिय पक्ष कोणताही निर्णय जाहिर करतात. सर्वात विचार करायाला लावणारी बाब म्हणजे मोफत धान्याची दिसून येते. सरकार मोफत धान्य ते रास्त भाव दुकानातून देत आहे. पुर्वी दोन रूपयाला मिळणारे धान्य हे आता तर मोफत केले. ते मोफत कशासाठी केले हे अजूनही कळाले नाही. याचा लाभ कोण घेत आहे या बाबत सर्वे केला जात नाही. मोफत देण्याची विचार व्हावा, मात्र गरजुंना मिळाले पाहिजे. गोरगरीब निराधारांना मिळाले पाहिजे. गरज नसताना आजही रास्त भाव दुकानातून मिळणारा तांदुळ थेट ईडली तयार करणाऱ्याच्या घशात जात आहे. गव्हू बाजारात विकला जात आहे ही वस्तूस्थिती आहे. त्याच प्रमाणे लाडकी बहिणीची योजना योग्य आहे का? यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. आज निराधार आहेत, त्यांना सरकार आर्थिक मदत करते, पेन्शन देते. त्याएवजी त्यांना कायम स्वरूपात रोजगार उपलब्ध केला पाहिजे. ज्यावेळी दोन रूपयात धान्य देण्याची सुरवात झाली त्यावेळी घरात महिण्याचे धान्य येत असल्याने शेतात काम करण्यासाठी माणसे मिळली नाहीत. आता तर मोफत मिळत असल्याने जनतेला काम करण्याची गरज भासत नाही. हा सर्वात मोठा धोका आहे. देशातील जनतेला आळशी बनविण्याचा हा प्रयत्न, राष्ट्रासाठी घातक ठरू शकतो. त्यामुळे न्यायालयाने जे निर्देश दिले ते योग्य आहेत, विचार करायाला लावणारे आहेत. मुळात मोफत कशासाठी द्यावयाचे? हात-पाय चांगले आहेत. काम करण्याची धमक आहे. असे असताना मोफत कशासाठी दिले जाते. जे काहीच करू शकत नाही. मुले बाळे सांभाळत नाहीत. अपंग आहेत. काही ही कमावु शकत नाहीत. पोटभरण्यासाठी सक्षम नाहीत अशांना मदत दिली पाहिजे. आज मदतीचा लाभ चुकीच्या व्यक्तींना मिळतो आहे. ही चुकीची बाब आहे. हे ओळखण्याची गरज आहे. जनतेनी सुद्धा मोफतचा काय परिणाम होणार आहे याचा विचार केला पाहिजे. आज न्यायालये जर अयोग्य मत व्यक्त करीत असेल तर त्यात काही तथ्य असेल. जर जनतेला मदत करावयाची झाली तर त्याला रोजगार कमविण्यासाठी सक्षम बनवावे. रोजगार निर्मिती करावी. सध्याला मोफत अन्नधान्य, सायकली किंवा वीज देण्यापेक्षा शिक्षण व आरोग्य सुविधा मोफत कराव्यात. समसमान शिक्षण मिळावे. इतर भाषेच्या शाळाचा उपयोग व्यवहारात नसल्याने बंद कराव्यात. राष्ट्रीय, स्वावलंबन व स्वसंरक्षणाचे धडे शिक्षणात मोफत शिक्षण द्यावेत. आज गरज कशाची आहे याचा विचार करून ते देण्याचा विचार करावा. देशात जातीपेक्षा राष्ट्रीय विचाराला प्राधान्य दिले पाहिजे. उठसुठ मोफत घोषणेमुळे राजकिय कोषावर संकट येत आहे. मदत द्यावी मात्र कोणाला द्यावी ज्यांना मदतीची खरीच गरज आहे त्यांना मिळाली पाहिजे. महिलांला दिड हजार दिले जाते या दिड हजारात काय होते याचा विचार घेणाऱ्यांनी तरी केला पाहिजे. आज कोणीही गरीब नाही. अतिषय बोटावर मोजण्याइतकी मंडळी आजही गरीबीच्या रेषेखाली आहेत. मुळात गरीब कोणाला म्हणायाचे हे ठरविण्याची गरज आहे. मतासाठी, जनतेला आकर्षित करण्यासाठी काही योजना जाहिर होतात हे योग्य नाही. जनतेला सरकार देते त्याच प्रमाणे जनतेकडूनच महसुली रूपाने वसुलही केले जाते. द्यायाचे झाले तर रोजगार निर्मिती करून द्यावी. हाताला काम द्यावे, कामे करून घ्यावीत, त्या बदल्यात मोबदला द्यावा. ऐतखाऊ बनवू नका, जनतेला आळशी बनवू नका. एकदा बसून खाण्याची सवय लागली की काम करू वाटत नाही. हे देशासाठी घातक ठरणारे आहे. आज संरक्षणाबरोबर शैक्षणिक खर्च मोठा आहे. या दोन बाबी महत्वाच्या आहे. शैक्षणिक बाबीवर खर्च होतो व संरक्षणावर होते तो केला पाहिजे. दोन बाबीची गरज आहे. त्यामुळे आज जी मोफत देण्याची चढाओढ लागली आहे ती थांबविली पाहिजे. या बाबत विरोधीपक्ष सुद्धा गप्प आहे. त्यांना दिसत नाही का? न्यायालयास यातील धुर्तपना कळाला, देशाचे होणारे नुकसान कळाले मात्र जनतेला कळाले नाही.सरकारला जनतेला द्यावयाचे झाले तर माफत दरात जीवनाश्यक वस्तू द्यावेत. जीवनाश्यक वस्तूचे दर नियंत्रित ठेवावे. महागाई कमी करावी. स्वयंपाकचा गॅस जनसामान्यास परवडेल या दरात मिळावा. मोफत नको तर वाजवी किंमतीत जीवनाश्यक वस्तू मिळाल्या पाहिजेत. तेल व डाळीचे दर परवडणारे नाहीत. उच्चप्रतिचे अन्नधान्य वाजवी दरात मिळाले पाहिजेत. त्यामुळे विचार करावा की, मोफत मुळे मोठा धोका होवू शकतो. एकदा का काम करण्यावी सवय मोडली, ऐतखाऊ फुकटात खाण्याची सवय घातक ठरू शकते. न्यायालयाच्या मताचा विचार गांर्भीयाने करण्याची गरज आहे. काही झाले तरी यापुढे जनतेनी विचार केला पाहिजे की, मोफत देण्यात येण्यामुळे आगामी काळात किती घातक ठरणारे आहे. मुळात एक विचार समोर येतो तो म्हणजे मोफत का व कशासाठी? दुसरा विचार या मोफत मुळे काय लाभ देशासाठी होवू शकेल? वास्तविक रोजगार मिळणाऱ्याबाबी अनेक आहे. एमआयडीसीतील कारखाने बंद का आहेत यावर विचार करावा. बंद पडणारे कारखाने परत सरकारने ताब्यात घ्यावेत. वरचेवर रोजगाराची संधी कशाप्रकारे उपलब्ध होईल यावर लक्ष असावे. रोजगाराची मोठी संधी असणारे सेक्टर मोठ्याच्या ताब्यात आहेत. सरकारी कार्यालयात किती गरवंताची आवश्यकता आहे. यावर विचार व्हावा. यापुढे मोफत काही दिले जावू नये. सर्वत्र स्वस्ताई करावी. कमी पैशात जीवनाश्यक वस्तू मिळाव्यात. सर्व आरोग्य सुविधा मोफत सक्तीने मिळाव्यात. शिक्षण पहिली पासूनच मोफत सर्वासाठी खुले करावे. असे झाले तर जनता आनंदी राहील. सरकारचे देखिल डोकेदुखी होणार नाही. यापुढे मोफत देण्याचा विचार सोडावा, त्यापेक्षा जनतेनी मोफत घेण्याचा विचार सोडून द्यावा. नाकारावे. द्यावयाचे झाले तर माफत दरात द्यावे असे निर्णय सर्वांनी घेण्याची गरज आहे. न्यायालयाने जे मत मांडले याचा गांर्भीयाने विचार जरूर करावा.

# एका तेजस्वी जीवनप्रवासाची प्रेरणागाथा : डॉ. राम बोरगांवकर सर

### मानवतेचा दीपस्तंभ : डॉ. राम बोरगांवकर सर
### (संगीत शंकर दरबार जीवन गौरव पुरस्काराच्या निमित्ताने)





मानवी जीवन केवळ जगण्यासाठी नसते, तर ते इतरांसाठी आशेचा किरण बनण्यासाठी असते. काही व्यक्तिमत्त्वे आपल्या विचारांनी, आचरणाने आणि सेवाभावाने समाजाच्या इतिहासात अजरामर ठरतात. डॉ. राम बोरगांवकर सर हे असेच एक तेजस्वी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे, ज्यांनी साधना, सेवा आणि समर्पण यांचा सुंदर संगम घडवत जीवनाला अर्थपूर्ण दिशा दिली. त्यांच्या जीवनप्रवासात अध्यात्माची गहनता आहे, समाजसेवेची तळमळ आहे आणि संस्कारांची समृद्ध परंपरा आहे. त्यांनी केवळ विचार मांडले नाहीत, तर ते आचरणात आणून समाजासमोर एक आदर्श उभा केला. त्यांच्या कार्यातून करुणा, त्याग आणि निस्वार्थी सेवाभाव यांचे दर्शन घडते. ही जीवनगाथा केवळ एका व्यक्तीची कथा नाही, ती प्रेरणेचा अखंड प्रवाह आहे. संघर्षांना सामोरे जात त्यांनी जिद्दीने आणि श्रद्धेने आपल्या ध्येयाची वाटचाल केली. त्यांच्या कार्यामुळे असंख्य जीवनांना नवी दिशा आणि नवचैतन्य मिळाले. दूरदृष्टी म्हणजे केवळ भविष्यात डोकावण्याची क्षमता नव्हे, तर वर्तमानातील कृतींचा उद्याच्या परिणामांशी संबंध जोडण्याची सजगता होय. डॉ. राम बोरगांवकर सर यांच्या विचारांत ही दूरदृष्टी स्पष्टपणे जाणवते. त्यांनी प्रत्येक निर्णय घेताना तात्कालिक लाभापेक्षा दीर्घकालीन परिणामांचा विचार केला. त्यांच्या मते, आज पेरलेले मूल्यांचे बीजच उद्याच्या सुदृढ समाजरचनेचे वृक्ष बनते.

सकारात्मकता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची दुसरी महत्त्वाची ओळख होती. संकटे, अडथळे आणि प्रतिकूल परिस्थिती यांना त्यांनी निराशेचे कारण न मानता, आत्मपरीक्षण आणि प्रगतीची संधी मानले. त्यांच्या विचारांत नेहमीच आशावादाचा सूर होता. ते सांगत असत की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी योग्य दृष्टिकोन आणि दृढ निश्चय यामुळे मार्ग नक्कीच सापडेल. दूरदृष्टीमुळे त्यांनी युवकांना केवळ वर्तमानातील यशावर समाधान न मानता, जीवनातील उच्च ध्येय निश्चित करण्याची प्रेरणा दिली. त्यांनी समाजाला सांगितले की, बदल घडवायचा असेल तर विचारांमध्ये व्यापकता आणि कृतीत सातत्य आवश्यक आहे. सकारात्मक दृष्टिकोनामुळे त्यांनी लोकांमध्ये आत्मविश्वास जागवला. त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला जाणवायचे की, अंधार कितीही दाट असला तरी एक छोटा दीपही दिशा दाखवू शकतो. अशा प्रकारे, दूरदृष्टी आणि सकारात्मकता यांचा समन्वय त्यांच्या नेतृत्वाला स्थैर्य, स्पष्टता आणि प्रेरणादायी शक्ती प्रदान करतो. हा संदेश आजच्या पिढीसाठी तितकाच महत्वाचा आहे. वर्तमानात सजग राहून, भविष्याचा विचार करा आणि प्रत्येक परिस्थितीत सकारात्मकतेची ज्योत जिवंत ठेवा. त्यांचे हेच विचार आमच्यासाठी निरंतर प्रेरणादायक बनतात.

''एका तेजस्वी जीवनप्रवासाची प्रेरणागाथा'' ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील तेज, विचारांची खोली आणि समाजासाठी केलेल्या योगदानाचा वेध घेण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. त्यांच्या अंतःकरणात सेवा, साधना आणि सकारात्मकतेची ज्योत प्रज्वलित करेल, अशी आशा आहे. डॉ. राम बोरगांवकर सर यांचे कार्य हे केवळ वैयक्तिक कर्तृत्वापुरते मर्यादित नसून ते समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी समर्पित आहे. त्यांनी समाजसेवेला केवळ कर्तव्य म्हणून नव्हे, तर साधनेचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून स्वीकारले. त्यांच्या दृष्टीने सेवा म्हणजे करुणेची कृतीशील अभिव्यक्ती होय. शैक्षणिक, सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात त्यांनी विविध उपक्रम राबवून अनेकांना नवसंजीवनी दिली. शिक्षणाच्या माध्यमातून संस्कारांची जोपासना व्हावी, नैतिक मूल्यांची जपणूक व्हावी आणि युवकांमध्ये सकारात्मक विचारांची बीजे रुजावीत, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा यामुळे असंख्य युवकांना जीवनाची योग्य दिशा मिळाली. समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांप्रती त्यांची संवेदनशीलता विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी मदतीचा हात पुढे करताना कोणताही भेदभाव केला नाही. त्यांच्या कार्यात समानता, बंधुता आणि मानवतेचा संदेश स्पष्टपणे दिसून येतो. विविध सामाजिक उपक्रम, प्रवचने, आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजमनात नैतिकतेची आणि आध्यात्मिकतेची जाणीव दृढ केली. त्यांच्या कार्याचा प्रभाव केवळ तात्पुरता नसून दीर्घकालीन आहे. त्यांनी निर्माण केलेली मूल्याधिष्ठित विचारसरणी आणि सेवाभावाची परंपरा आजही अनेकांना प्रेरणा देत आहे. त्यांच्या कार्यातून समाजाला मिळालेला आत्मविश्वास आणि सकारात्मकता हीच त्यांच्या कार्याची खरी फलश्रुती आहे.

डॉ. राम बोरगांवकर सर यांची विचारधारा ही अध्यात्म, नैतिकता आणि मानवतावाद यांचा समन्वय साधणारी आहे. त्यांच्या मते खरे अध्यात्म हे केवळ ध्यानधारणेत नसून, ते आपल्या दैनंदिन आचरणात प्रकट झाले पाहिजे. विचार आणि कृती यांतील सुसंगती हीच त्यांच्या तत्त्वज्ञानाची मूलभूत ओळख आहे. त्यांनी नेहमीच सत्य, करुणा, संयम आणि समर्पण या मूल्यांचा पुरस्कार केला. जीवनातील प्रत्येक कृती ही समाजहिताशी जोडलेली असावी, असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांनी अंधश्रद्धेपेक्षा विवेकाला, अहंकारापेक्षा नम्रतेला आणि स्वार्थापेक्षा परमार्थाला अधिक महत्त्व दिले. त्यांच्या प्रवचनांत जीवनाचे गूढ साध्या, सोप्या आणि प्रभावी शब्दांत मांडलेले दिसते. ते सांगत असत की, प्रत्येक व्यक्तीत अपार शक्ती दडलेली आहे; फक्त तिचा योग्य मार्गाने उपयोग करण्याची गरज आहे. आत्मविश्वास, सकारात्मकता आणि नीतिमूल्ये यांच्या आधारावरच व्यक्ती आणि समाज दोन्ही सशक्त होऊ शकतात. त्यांची विचारधारा ही केवळ तात्त्विक चर्चा नसून आचरणातून सिद्ध झालेली जीवनपद्धती आहे.

डॉ. राम बोरगांवकर सर यांचा जीवनप्रवास हा अंतर्मुख साधनेपासून बहिर्मुख सेवेकडे झालेल्या उत्क्रांतीची प्रेरणादायी कहाणी आहे. त्यांच्या आयुष्याची सुरुवात संस्कार, श्रद्धा आणि आत्मशोध यांच्या पायावर उभी राहिली. अध्यात्माची ओढ आणि आत्मविकासाची जिज्ञासा यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक सशक्त दिशा दिली. साधना ही त्यांच्या जीवनातील केवळ वैयक्तिक प्रक्रिया नव्हती; ती समाजासाठी काहीतरी करण्याची अंतःप्रेरणा होती. ध्यान, चिंतन आणि मूल्यनिष्ठ जीवनशैली यांच्या माध्यमातून त्यांनी आत्मबल आणि संयम जोपासला. या अंतःशक्तीमुळेच त्यांनी जीवनातील विविध आव्हानांना शांतपणे आणि ठामपणे सामोरे गेले. परंतु त्यांची साधना केवळ स्वतःपुरती मर्यादित राहिली नाही. अंतःकरणात जागृत झालेली करुणा आणि मानवतेची भावना त्यांना सेवेकडे घेऊन गेली. त्यांनी जाणले की खरे अध्यात्म म्हणजे समाजातील दुःख हलके करण्यासाठी, अज्ञान दूर करण्यासाठी आणि नैतिकतेचा दीप प्रज्वलित करण्यासाठी कार्य करणे होय. शिक्षण, समाजजागृती, नैतिक मूल्यांचा प्रसार आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य त्यांच्या सेवाभावाचे जिवंत उदाहरण आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेकांनी आपले जीवन नव्या दृष्टिकोनातून पाहण्यास सुरुवात केली. त्यांनी लोकांना आत्मविश्वास, सकारात्मकता आणि कर्तव्यनिष्ठा यांची जाणीव करून दिली. डॉ. राम बोरगांवकर सर यांचा हा प्रवास आपल्याला शिकवतो की, साधना ही केवळ बाह्यजगतातील सेवा यांचा संगम घडला की जीवन खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण बनते. त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास प्रत्येकाला एक संदेश देतो.

साधना म्हणजे अंतर्मनाची शुद्धी, सेवा म्हणजे त्या शुद्धतेची कृतीशील अभिव्यक्ती आणि समर्पण म्हणजे अहंकाराचा त्याग करून जीवन उच्च ध्येयासाठी अर्पण करणे. डॉ. राम बोरगांवकर सर यांच्या व्यक्तिमत्त्वात या तिन्ही गुणांचा अद्भुत आणि सुसंवादी संगम आढळतो. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे माणसाला माणूस म्हणून स्वीकारणे. जात, पंथ, भाषा किंवा सामाजिक स्तर यापलीकडे जाऊन प्रत्येकाशी सन्मानाने वागणे, हीच खरी आध्यात्मिकता आहे. करुणा आणि सहानुभूती या मूल्यांमुळेच समाजात सुसंवाद आणि शांतता नांदते. त्यांच्या साधनेत शांतता आहे, विचारांची गहनता आहे आणि आत्मशोधाची प्रामाणिकता आहे. त्यांच्या सेवेत करुणा आहे, समता आहे आणि समाजातील प्रत्येक घटकाला उभारी देण्याची तळमळ आहे. त्यांच्या समर्पणात निस्वार्थी वृत्ती आहे, कर्तव्यनिष्ठा आहे आणि मूल्यांशी अखंड निष्ठा आहे. या त्रिवेणी संगमामुळेच त्यांचे जीवन केवळ वैयक्तिक यशापुरते मर्यादित राहत नाही, तर ते समाजासाठी प्रेरणादायी व आदर्श ठरते. त्यांनी दाखवून दिले की, साधना अंतःकरण घडवते, सेवा समाज घडवते आणि समर्पण व्यक्तिमत्त्वाला तेजस्वी बनवते. स्वतःमध्ये प्रकाश निर्माण करुण त्या प्रकाशाने समाज उजळवला. यांचे जीवन हे याच सुंदर संगमाचे सजीव उदाहरण आहे. यांच्या विचारसरणीचा पाया सत्यनिष्ठा आहे.त्यांच्या मते, तात्पुरत्या फायद्यासाठी तडजोड करणे हे व्यक्तिमत्त्वाला कमकुवत बनवते. प्रामाणिकता ही केवळ नैतिक अपेक्षा नसून ती विश्वासाचे अधिष्ठान आहे. समाजात विश्वासाचे नाते दृढ झाले तरच विकासाची पायाभरणी मजबूत होते. ते मानत की खरे मोठेपण दिखाव्यात नसून साधेपणा संयमित जीवनशैली, नम्र वर्तन आणि अहंकाराचा त्याग यांमुळे व्यक्तिमत्त्व अधिक तेजस्वी होते. साधेपणा माणसाला वास्तवाशी जोडून ठेवतो आणि त्याला स्थैर्य प्रदान करतो.

लेखक
**डॉ. संतोष कुलकर्णी**
**हिंदी विभाग प्रमुख,**
**सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर**
9767755911
Email. :
drskulkarni101@gmail.com

# मोबाईलचा मेंदूवर काय होतोय परिणाम?

गाझियाबादमध्ये 'कोरियन लव्ह गेम'चा टास्क पूर्ण करण्याच्या नादात तीन सख्या बहिणींनी नवव्या मजल्यावरून उडी मारून जीवन संपवले. या घटनेमुळे मुलांचे मोबाईलचे व्यसन आणि त्यातून येणारे नैराश्य हा पुन्हा एकदा चिंतेचा मोठा विषय ठरला आहे. या बहिणींच्या डायरीतून हा निर्णय मोबाईलच्या व्यसनाचाच परिणाम असल्याचे समोर आले आहे.

स्क्रीन टाईम आणि वाढते नैराश्य

जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, दोन वर्षांपर्यंतच्या मुलांनी स्क्रीन पाहू नये, परंतु भारतात ६१% मुले दोन वर्षांच्या आधीच स्क्रीन पाहू लागतात. ज्या मुलांचा स्क्रीन टाईम ४ तासांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यात नैराश्याचे प्रमाण २६% इतके जास्त आहे. ५० टक्क्यांहून अधिक किशोरवयीन मुले दररोज ४ तासांपेक्षा जास्त वेळ स्क्रीनसमोर घालवत आहेत, ज्यामुळे त्यांच्यात स्थूलपणा, चिडचिडेपणा आणि झोप पूर्ण न होण्याच्या समस्या निर्माण होत आहेत. न्यूरो शास्त्रज्ञ डॉ. जरेड कोनी हॉरवॉक यांच्या दाव्यानुसार, डिजिटल तंत्रज्ञानावर जास्त अवलंबून असल्यामुळे 'जनरेशन जी'चा (१५ ते २७ वयोगट) बुद्ध्यांक त्यांच्या पालकांच्या पिढीपेक्षा कमी झाला आहे. मुले अभ्यासासाठी किंवा कोणत्याही माहितीसाठी त्वरित गुगल किंवा एआयचा वापर करतात, ज्यामुळे त्यांची स्वतःची विचार करण्याची आणि समस्या सोडवण्याची क्षमता कमी होत आहे.

या दुष्परिणामांमुळे स्वीडनसारख्या देशांनी शाळांमधून डिजिटल गॅजेट्स काढून पुन्हा कागद, पेन आणि छापील पुस्तकांकडे जाण्याचा निर्णय घेतला आहे. फ्रान्स, नेदरलँड आणि ब्रिटननेही शाळांमध्ये टॅबलेट्स आणि लॅपटॉपच्या वापरावर मर्यादा आणल्या आहेत. संशोधनानुसार, माणूस स्क्रीनपेक्षा सखोल अभ्यास आणि संवादातून अधिक चांगले शिकतो.

पालकांनी काय करावे?

शिक्षण तज्ज्ञांनुसार, मुलांचे रडणे थांबवण्यासाठी त्यांच्या हातात स्मार्टफोन देण्याची घाई पालकांनी करू नये. अशा प्रकारे मुले हळूहळू मोबाईलच्या विळख्यात अडकतात, ज्याचे परिणाम भविष्यात घातक ठरू शकतात.

## सावधान! हिवाळ्यात चुकूनही खाऊ नये ही फळे

हिवाळ्यात शरीराची पचनसंस्था मंदावते. त्यामुळे काही फळे खाणे आपल्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. ती खाल्ल्याने आपण आजारी पडू शकतो. ज्यामुळे सर्दी आणि फ्लूचा धोका वाढू शकतो. याचा परिणाम पचनसंस्थेवरही होतो. त्यामुळे हिवाळ्यात काही फळे खाणे टाळावे.

**हिवाळ्यात ही फळे टाळा.**

टरबूज, काकडी आणि खरबूज सारखी फळे शरीराला थंडावा देतात, परंतु तज्ञ हिवाळ्यात या फळांचे सेवन मर्यादित ठेवण्याची शिफारस करतात. कारण कमकुवत पचनसंस्थेसाठी ते पचण्यास कठीण असू शकतात. या फळांमधील थंड गुणधर्म आणि जास्त पाण्याचे प्रमाण पचनसंस्थेवर दबाव आणू शकतात, ज्यामुळे गॅस आणि अपचन यासारख्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊ शकतात.

याव्यतिरिक्त, हिवाळ्यात जास्त प्रमाणात अननस खाल्ल्याने घसा खवखवणे, तोंडात अल्सर आणि ऍलर्जी होऊ शकते. हिवाळ्यात या फळाचे जास्त सेवन केल्याने रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होऊ शकतो. पचनसंस्था कमकुवत होऊ शकते. कारण या हंगामात ही फळं पचण्यास कठीण असते. त्यामुळे ेष्माचे उत्पादन वाढते. जास्त पाण्याचे प्रमाण शरीराचे तापमान कमी करू शकते.

हिवाळ्यात केळी खाणे देखील टाळावे कारण ते ेष्मा निर्माण करतात. केळी खाल्ल्यानंतर सकाळी अनेकांना जडपणा जाणवतो. म्हणूनच, हिवाळ्यात ते कमी प्रमाणात खाणे चांगलं.

द्राक्षे शरीराला थंडावा देतात कारण त्यांच्यात थंडावा निमर्ण होतो आणि त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असते. हिवाळ्यात जास्त द्राक्षे खाल्ल्याने अनेकदा खोकला आणि सर्दी होऊ शकते. कारण त्यात साखरेचे प्रमाण जास्त असते, हिवाळ्यात ते खाणे हानिकारक मानले जाते.

हिवाळ्यात कोणती फळे खावीत? हिवाळ्यात सफरचंद, संत्री, पेरू, डाळिंब आणि किवी यांसारखी फळे खाण्याची शिफारस केली जाते. ही फळे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात आणि व्हिटॅमिन सीने समृद्ध असतात. ते शरीराला उबदारपणा आणि ऊर्जा प्रदान करतात.

तुमच्या पचनसंस्थेची विशेष काळजी घ्या: पचनसंस्था ही शरीरातील सर्वात महत्वाच्या प्रणालींपैकी एक आहे. आपण जे अन्न खातो ते पचवण्यासाठी आणि त्यातील पोषक तत्वे शोषण्यासाठी ती जबाबदार असते. हिवाळा तुमच्या खाण्याच्या सवयींवर आणि परिणामी तुमच्या पचनसंस्थेवर अनेक प्रकारे परिणाम करू शकतो. म्हणूनच, हिवाळ्यात तुमच्या पचनसंस्थेची विशेष काळजी घेणे महत्वाचे आहे.

मंद चयापचय: हिवाळ्यात, तुमचे शरीर सामान्य तापमान राखण्यासाठी ऊर्जा साठवते. यामुळे तुमचे चयापचय मंदावते. मंद चयापचयामुळे गॅस, बद्धकोष्ठता, अतिसार आणि पोटफ ुगी सारख्या पचन समस्या उद्भवू शकतात. चयापचय गतिमान करण्यासाठी, नियमित व्यायाम करा आणि भरपूर पाणी प्या.

## थंड दूध पिल्याने काय होते? आरोग्याला फायदा होतो की तोटा?

दूध पिणे ही आपली रोजची सवय आहे. पण थंड दूध



पिणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे की नुकसानकारक, याबाबत अनेकांच्या मनात संभ्रम असतो. चला तर मग जाणून घेऊया यामागचे सत्य.

दूध हे भारतीय घरांमध्ये सर्वाधिक वापरले जाणारे दुग्धजन्य उत्पादन आहे. प्रोटीन, मॅग्नेशियम, कॅल्शियम, झिंक, व्हिटॅमिन डी आणि पोटॅशियमने भरपूर असलेले दूध पोषणतत्त्वांचा खजिना मानले जाते. काही लोक दूध गरम पितात, तर काहींना थंड दूध पिणे अधिक आवडते. थंड दूध पिल्याने शरीराला कोणते फायदे होतात, ते जाणून घेऊया.

**थंड दूध पिण्याचे फायदे**

**पोटाच्या अल्सरमध्ये आराम :**

जर तुम्हाला वारंवार पोटातील अल्सर किंवा ॲसिडिटीचा त्रास होत असेल, तर थंड दूध जादुई उपायासारखे काम करते. पचनासंबंधी समस्या असतील, तर एका ग्लास थंड दुधात एक चमचा इसबगोल मिसळून पिऊ शकता. हे ॲसिड रिफ्लक्स कमी करण्यास मदत करते.

**वजन कमी करण्यास मदत :**

ऐकायला विचित्र वाटेल, पण थंड दूध वजन कमी करण्यास मदत करू शकते. थंड दुधातील कॅल्शियम शरीरातील मेटाबॉलिज्म सुधारते, ज्यामुळे अधिक कॅलरी बर्न होतात. एक ग्लास दूध पिल्याने पोट दीर्घकाळ भरलेले राहते आणि अनावश्यक स्नॅकिंग टाळण्यास मदत होते.

**हाय ब्लड प्रेशरमध्ये उपयुक्त :**

हाय बीपीचा त्रास असल्यास थंड दूध पिणे फायदेशीर ठरू शकते. हे शरीरात वेगाने कार्य करते. थंड दूध रक्तप्रवाहासोबत फिरून तणाव वाढवणाऱ्या कॉर्टिसोल हार्मोनची पातळी कमी करते. तसेच दुधातील कॅल्शियम, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम हे बीपी कमी करण्यास मदत करणारे पोषक घटक आहेत. त्यातील बायोक्टिव पेप्टाइड्सही रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास उपयोगी ठरतात.

**त्वचेसाठी फायदेशीर :**

थंड दूध इलेक्ट्रोलाइट्सने भरपूर असते, जे शरीरातील डिहायड्रेशनशी लढण्यास मदत करते. त्यामुळे शरीर हायड्रेटेड राहते आणि त्वचा चमकदार दिसते. थंड दूध पिण्याचा सर्वोत्तम वेळ म्हणजे सकाळची वेळ.

**छातीत जळजळ कमी करते :**

छातीत जळजळ होत असल्यास थंड दूध पिणे फायदेशीर ठरते. दुधातील भरपूर कॅल्शियम अतिरिक्त आम्ल (सिड) शोषून घेण्यास मदत करते आणि आम्लनिर्मिती रोखते. त्यामुळे ॲसिडिटी आणि ॲसिड रिफ्लक्समुळे होणारी जळजळ कमी होते.

भारतीय आहार पद्धतीमध्ये दुधाला पूर्ण अन्न म्हटले गेले आहे. त्यामुळेचे सण, समारंभामध्ये दुधाचा आणि दुग्धजन्य पदार्थांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

ही सर्व माहिती वाचकांपर्यंत पोहोचविणे इतकाच हेतू आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या प्रकृतीनुसार आहार घेणे महत्वाचे आहे. त्यामुळे कोणत्याही माहितीचे अनुकरण करताना आरोग्य तज्ञ किंवा डॉक्टरांचा सल्ला घेणे योग्य ठरू शकते.

# राज्यसभेसाठी मोर्चेबांधणी

राजकारणातून निवृत्तीचा विचार शरद पवार अधूनमधून बोलून दाखवतात. नवीन पिढीला आता संधी दिली पाहिजे, मी कुठेतरी थांबले पाहिजे, असेही ते म्हणतात. आजच्या राजकीय परिस्थितीत ते आपल्या या विचारावर ठाम राहतील का? कदाचित ते आपली भूमिका बदलतील सुद्धा!

निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या रिक्त झालेल्या ३७ जागांच्या निवडणुकीचे संकेत दिले आहेत. पुढील महिन्यात ही निवडणूक होत असून, तिची अधिसूचना येत्या २६ रोजी जाहीर होईल. महाराष्ट्रातील सात जागा असून, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे दोन, भाजपचे दोन, काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रत्येकी एक आणि रिपब्लिकन पक्षाचे एक असे सातजण येत्या एप्रिलमध्ये राज्यसभेतून निवृत्त होत आहेत. निवृत्त होत असलेल्यांमध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांचाही समावेश असल्याने ते पुन्हा राज्यसभेची निवडणूक लढवणार का याविषयी उत्सुकता आहेत. स्वतः पवार यांनी ते इच्छुक असल्याबद्दल जाहीररीत्या काहीच खुलासा केला नसला तरी ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी पवार राज्यसभेसाठी पुन्हा उत्सुक असल्याचे म्हटले आहे. राऊत हे राष्ट्रवादीचे प्रवक्ते कधी झाले असा यावरून प्रश्न पडतो.



निवडणुकीत विजयासाठी प्रत्येक उमेदवाराला प्रथम पसंतीच्या ३७ मतांची आवश्यकता आहे. महाविकास आघाडीचे पक्षीय बलाबल ४६ एवढेच आहे. महाविकास आघाडीने सर्वानुमते उमेदवार दिल्यास तो विजयी होईल; पण महाविकास आघाडीतच फाटाफूट झाल्यास त्याचा फायदा भाजप उचलू शकतो. शरद पवारांच्या नावाला सर्वानुमते पाठिंबा मिळाल्यास त्यांची निवड ही काळ्या दगडावरची रेघ आहे. मागील निवडणुकीप्रमाणे भाजप धक्कातंत्र वापरून आपला ७ वा उमेदवार निवडून आणणार का हे पाहणेही रंजक ठरणार आहे. महायुतीतील पक्षीय बलाबल पाहता, त्यांचे सहा जण राज्यसभेवर निवडून जाऊ शकतात. भाजपच्या कोट्यातून रिपब्लिकन पक्षाचे रामदास आठवले यांची वर्णी पुन्हा लागू शकते. महाविकास आघाडीतील ठाकरे गटानेही उमेदवार देण्याचा विचार बोलून दाखवला आहे. काँग्रेसची भूमिका अद्याप स्पष्ट नाही; पण राज्यसभेसाठी त्यांचेही अनेकजण इच्छुक आहेत. त्यामुळेच महाविकास आघाडीत उमेदवाराबाबत एकमत होणार का, हा खरा प्रश्न आहे.

**सातवी जागा कोणाला?**


महायुतीमधून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पार्थ पवार यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाल्यासारखेच आहे. भाजपकडून विनोद तावडे, विनय सहस्रबुद्धे, सुनील देवधर यांच्या नावाची चर्चा आहे, तर शिंदे यांच्या शिवसेनेकडून माजी खासदार राहुल शेवाळे यांच्या नावाला पसंती मिळेल अशी शक्यता आहे. खरी स्पर्धा आहे ती महाविकास आघाडीत. शरद पवार यांच्या वयाचा आणि शारीरिक क्षमतेचा विचार करता ते खरोखरीच निवडणूक लढवणार का, की संजय राऊत यांनी विधान परिषदेच्या आगामी निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्यासाठी राष्ट्रवादीचा पाठिंबा मिळवण्यासाठी पवारांचे नाव आतापासूनच पुढे केले अशी चर्चा आहे. शरद पवार अनुत्सुक असतील, तर काँग्रेसही त्या जागेवर आपला दावा सांगू शकेल. ठाकरे गटाच्या प्रियांका चतुर्वेदी निवृत्त होत आहेत, त्या पुन्हा निवडणुकीत लढणार असतील, तर मित्र पक्षांच्या पाठिंब्याशिवाय त्यांची निवड अशक्य आहे. महाविकास आघाडीने एकमताने उमेदवार न दिल्यास सहाव्या आणि सातव्या जागेसाठी चुरशीचा सामना होऊ शकतो. महायुतीकडे २३५ पेक्षा अधिक संख्याबळ असल्याने त्यांच्या सातपैकी सहा जागा सहजपणे निवडून येऊ शकतात; मात्र महाविकास आघाडीला आणखी एखादी जागा निवडून आणायची झाल्यास अपक्षांची मताची आवश्यकता लागेल. मविआमध्ये फाटाफूट, क्रॉस व्होटिंग किंवा मतदानाला काहींना गैरहजर ठेवून सातवी जागा भाजप पदरात पाडून घेऊ शकेल. देवेंद्र फडणवीस अशा रणनीतीसाठी वाकबगार आहेतच! स्वतः शरद पवार निवडणुकीस उभे नसतील, तर महाविकास आघाडीत उमेदवारावरून एकमत न झाल्यास भाजप या संधीचा फायदा उचलू शकतो. शरद पवार आता प्रत्यक्ष राजकारण न करता थांबणार का आणि नवीन उमेदवाराला संधी देणार का हेही पाहावे लागेल. शरद पवार या एकमेव नावावरच महाविकास आघाडीत एकमत होऊ शकते. पवार रिंगणात असतील, तर भाजपसाठी फोडाफोडीचे तंत्र नैतिक आणि राजकीयदृष्ट्या अवघड ठरेल. पवार यांचा प्रभाव अजूनही कायम असल्याने मविआला त्यांच्या उमेदवारीचाच प्राधान्याने विचार करावा लागेल.

# मोठी त्याची सावली

गोष्ट लहान, मोठा अर्थ : शिल्पा अष्टमकर

मोठी त्याची सावली म्हणजे एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व, कार्य, विचार किंवा कर्तृत्व इतके प्रभावी असते की त्याचा परिणाम इतरांवर दीर्घकाळ जाणवतो. सावली ही नेहमी आपल्यासोबत असते – त्याचप्रमाणे त्या व्यक्तीचे संस्कार, शिकवण किंवा कार्य समाजावर कायम प्रभाव टाकत राहते. मोठी सावली हे एखाद्या महान व्यक्तीच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक आहे. जसा एखादा विशाल वृक्ष आपल्या सावलीत अनेकांना आसरा देतो, तशीच महान माणसे आपल्या विचारांनी, कार्याने आणि संस्कारांनी समाजाला आधार देतात. त्यांच्या कर्तृत्वाची सावली पुढील पिढ्यांवरही कायम राहते. ज्या व्यक्तीचे विचार, आचरण आणि कार्य मोठे असते, त्याची सावलीही मोठी असते. येथे सावली हा शब्द प्रतीकात्मक अर्थाने वापरलेला आहे. हे लक्षात घ्या. व्यक्तीच्या चांगल्या गुणांचा, संस्कारांचा आणि कर्तृत्वाचा समाजावर पडणारा प्रभाव म्हणजे त्याची मोठी सावली होय.

आपल्या जीवनात आई-वडील, गुरुजन, समाजसेवक, राष्ट्रपुरुष यांची सावली आपल्यावर असते. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा परिणाम आपल्या वर्तनात दिसून येतो. उदाहरणार्थ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या शिक्षणाच्या आणि समतेच्या विचारांची सावली आजही समाजाला मार्गदर्शन करते. त्यांच्या कार्याची उंची मोठी असल्यामुळे त्यांची सावलीही विशाल आहे. मोठी सावली असण्यासाठी व्यक्तीचे चारित्र्य स्वच्छ, विचार उच्च आणि कृती निःस्वार्थी असावी लागते. फक्त पद, पैसा किंवा प्रसिद्धी यामुळे सावली मोठी होत नाही; तर समाजहितासाठी केलेले कार्य, प्रामाणिकपणा आणि सातत्य यामुळे व्यक्तिमत्त्व उजळते. ज्या झाडाची वाढ भक्कम आणि उंच असते, त्याची सावली अधिक पसरते. त्याचप्रमाणे ज्या माणसाचे व्यक्तिमत्त्व उंच आणि व्यापक असते, त्याचा प्रभावही दूरवर पोहोचतो.



आजच्या काळात आपण चांगल्या व्यक्तींच्या सावलीत राहून योग्य संस्कार आत्मसात करणे गरजेचे आहे. चांगले विचार, कठोर परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोन यामुळे प्रत्येक जण स्वतःची सावली मोठी करू शकतो. समाजासाठी काहीतरी करण्याची वृत्ती ठेवली, तर आपले जीवन अर्थपूर्ण ठरते. मोठी त्याची सावली म्हणजे मोठ्या मनाचा, उच्च विचारांचा आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीचा व्यापक प्रभाव होय. आपणही आपल्या कर्तृत्वाने आणि सद्गुणांनी अशी मोठी सावली निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.एक लहान मुलगा शिक्षणासाठी आपल्या मावशीच्या घरी राहायला आला. तो शाळेत जाऊ लागला. मित्रांबरोबर हिंडू-फिरू लागला. पण म्हणतात ना एखाद्याच्या संगतीने एकमेकांत, एकमेकांचे गुणदोष उतरतात. थोडक्यात, 'ढवळ्याशेजारी बांधला पवळा, वाण नाही पण गुण लागला.' या छोट्या मुलांमध्ये मित्रांचे गुणदोष दिसू लागले. काही चांगले तर काही वाईट. तो एके दिवशी आपल्या मित्रांबरोबर आमराईत आंबे पाडण्यासाठी गेला. मित्रांनी त्याला आग्रह करून आंब्याच्या झाडावर चढवले. तो आंबे पाडू लागला. इतर जण ते गोळा करू लागले. इतक्यात त्यांना रखवालदार येत असल्याची चाहूल लागली. आंबे वेचणारी सर्व मुले पळून गेली. मात्र झाडावर चढलेला त्या मुलाला पटकन उतरता आले नाही. तो रखवालदाराच्या हाती सापडला. रखवालदाराने त्याचा हात पकडून त्याच्या गालात एक चपराक ठेवून दिली आणि परत मारण्यासाठी हात उगारला. तेव्हा तो मुलगा कळवळून रखवालदाराला म्हणाला, काका, काका मला मारू नका हो, मला वडील नाहीत. मी तुमच्या पाया पडतो. रखवालदार त्याला म्हणाला, वडील नाहीत ना. मग असं वागू नकोस. या एका प्रसंगाने त्या मुलाच्या मनाचे परिवर्तन झाले. तो खूप शिकला. खूप मोठा झाला. इतकेच नव्हे तर हाच मुलगा भारताचा पंतप्रधान झाला. त्या मुलाचे नाव होते, लालबहादूर शास्त्री. ज्यांनी आपल्याला 'जय जवान, जय किसान' ही घोषणा दिली. म्हणतात ना 'मूर्ती लहान, पण कीर्ती महान.'तात्पर्य : चांगल्या सवयी आपल्याला योग्य दिशेने नेतात. विचार : सत्कृत्यांची वर्णने सुवर्णाक्षरांनी लिहिली जातात.

# कलेचे मूल्य

कथा : रमेश तांबे

हजार बाराशे वस्तीचं एक गाव होतं. गाव तसं सधन होतं. त्यांना त्यांच्या गावातल्या एका पुढाऱ्याचा पुतळा बनवायचा होता. म्हणून ते एका चांगल्या शिल्पकाराच्या शोधात होते. त्यासाठी त्यांनी गावाचं एक शिष्टमंडळ नेमलं होतं. एके दिवशी ते शिष्टमंडळ एका शिल्पशाळेत गेलं. तिथे अनेक मूर्ती, पुतळे ओळीने मांडले होते. ते पुतळे, तिथल्या मूर्ती खूपच छान होत्या. शिल्पकाराची कारागिरी बघून शिष्टमंडळ खूश झालं. त्यांनी ठरवलं की, याच शिल्पकाराला पुतळा बनवायला द्यायचं. मग दिवाणखान्यात दोघांची बोलणी सुरू झाली. शिष्टमंडळात, सरपंच, दोन प्रतिष्ठित गावकरी, शाळेचे मुख्याध्यापक अशी मंडळी होती. आता चर्चा सुरू झाली. कोणाचा पुतळा बनवायचा आहे. कशा पद्धतीनं बनवायचा आहे. हे हळूहळू ठरत होतं. किती फुटांचा हवा? कुठे बसवणार? इतकी सारी इत्थंभुत माहिती त्यांनी शिल्पकाराला पुरवली.

शिल्पकार अगदी मन लावून ऐकत होता. शेवटी चर्चेची गाडी पैशावर आली. किती पैसे घेणार आपण? असं विचारल्यावर शिल्पकारानं कोणताही विचार न करता सरळ सांगून टाकलं की या पुतळ्याची मी पाच लाख रुपये बिदागी म्हणून घेणार. इतके पैसे ऐकल्यानंतर शिष्टमंडळातील अनेकांचे डोळे विस्फारले. त्यातला एक प्रतिनिधी अक्षरशः काय एवढे पैसे! असे ओरडलाच! त्यांच्याकडे पाहत शिल्पकार म्हणाले, होय एवढेच पैसे मी आपणाकडून घेणार! त्यात एका पैशाची सूट मिळणार नाही. शिष्टमंडळातला दुसरा सदस्य जमेल तितका गरीब भाव चेहऱ्यावर आणत शिल्पकाराला म्हणाला, दादा काही पैसे कमी करता आले तर पाहा ना! एक पुतळा बनवायचे एवढे पैसे कुणी घेतं का! शिल्पकार अगदी सावकाशीनं म्हणाले, होय मी एवढेच पैसे घेतो. कारण एवढा मोठा पुतळा बनवायचा तर त्यासाठी भरपूर मेहनत असते. शिवाय वेळदेखील भरपूर लागतो. त्याचबरोबर मी माझे काम खूप कटाक्षाने चांगलेच करण्याचा प्रयत्न करतो. पण शिष्टमंडळाचे सदस्य किंमत कमी करण्याचा आपला हेका काही सोडेनात. मग शिल्पकार सांगू लागला, त्यात खूप काम असतं. त्यासाठी वेगवेगळी हत्यारे लागतात. खूप मेहनत असते. मदतीला अनेक माणसं लागतात. एक सदस्य म्हणाला, हे बघा शिल्पकार दादा, हवं तर आम्ही मदतीला माणसं देतो. काही हत्यारे लागतील ती आणून देण्याचा आम्ही प्रयत्न करू. पण तुम्ही पैसे कमी करा! शेवटी शिल्पकार म्हणाला, नाही जमणार. माझ्या कामाचे मला पाच लाख रुपये मिळालेच पाहिजेत. पण शिष्टमंडळ हट्टालाच पेटले, ते म्हणाले, तुम्ही सांगा अजून तुमच्यासाठी आम्ही काय करू मग शिल्पकार मोठ्या नम्रपणे म्हणाला, मंडळींनो, खरंच हा पुतळा बनवण्यासाठी एक विशिष्ट प्रकारची माती लागते त्याशिवाय छान पुतळा तयार होत नाही. तसा शिष्टमंडळातला एक उत्साही सदस्य लगेच म्हणाला, दादा, आम्हाला सांगा कुठे मिळते ती माती. आम्ही लगेच ती घेऊन येऊ! मग शिल्पकार हलकेच हसत म्हणाला, अरे बाबांनो ही कला कमावण्यासाठी मी माझ्या आयुष्याची माती केली आहे. तेव्हा कुठे मला ही कला साध्य झाली आहे. त्यामुळे मला माझ्या कलेचं मूल्य मोजून घेतलंच पाहिजे! शिल्पकाराचं बोलणं ऐकून सगळं शिष्टमंडळ अगदी गप्पच झालं! तर मित्रांनो, कोणतीही कला मिळवण्यासाठी आपल्याला आयुष्यभर कष्ट, मेहनत करावी लागते. झोकून देऊन काम लागतं. आयुष्याची माती करावी लागते. तेव्हा कुठे आपल्याला यश मिळतं. झाडांची मुळं स्वतःला गाडून घेतात जमिनीत, अंधार कोठडीमध्ये. तेव्हा पुढे झाड वाढतं. तसेच एखाद्या कलाकाराला आयुष्यभर कोंडून घ्यावं लागतं, मेहनत करावी लागते. समाजापासून दूर राहावं लागतं. नंतर पुढे त्याला ती कला प्रसन्न होते. पण आपल्यापैकी बरेच जण मात्र कोणतीही मेहनत न करता आपल्याला दैवी चमत्काराने कला प्राप्त होईल, याची आयुष्यभर वाट पाहत बसतात.




# खोकला व त्याव उपाय

खोकल्यासाठी मध, आले, हळद आणि वाफ घेणे हे अत्यंत प्रभावी घरगुती उपाय आहेत. दररोज कोमट पाणी पिणे, लवंग-वेलचीचा चहा आणि तुळशीचा रस घेतल्याने घसा खवखवणे व कफ कमी होण्यास मदत होते. रात्री झोपण्यापूर्वी अर्धा चमचा हळद कोमट दुधात मिसळून घेतल्याने आराम मिळतो खोकल्यासाठी प्रभावी घरगुती उपाय मध आणि आले: १ चमचा आल्याच्या रसात १ चमचा मध मिसळून दिवसातून दोनदा प्या.

**(क्रमशः उद्याच्या अंकात)**

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



**रिलेशनशिपमध्ये आल्यानंतर ...**काही दिवसांत ते शरिरात तयार होऊ लागतं. पीईए मेंदूतील ठराविक भागात डोपामाईनचा पुरवठा करण्यास सुरूवात करतं. चॉकलेटमध्ये पीईए अत्यंत कमी प्रमाणात आढळत असलं तरी ते खाल्यानंतरही सक्रिय राहतं किंवा नाही याबाबत शंका आहेत. तसंच रक्तप्रवाह वाढवण्यासाठी कोको उपयुक्त असल्याचं सांगितलं जातं. तर मग चॉकलेट आणि लैंगिक क्षमता यांचा संबंध कधीपासून आहे? १६ व्या शतकातील स्पॅनिश संशोधक हर्नेस कोर्टेस यांनी चॉकलेटचा शोध लावल्याचं सांगितलं जातं.

## २ Joke — विनोद




शिक्षकांनी विद्यार्थ्याला विचारले की, त्याला त्यांचे शेवटचे लेक्चर आवडले का?
विद्यार्थी म्हणाला, ङ्गते जर खरोखरच शेवटचे लेक्चर असेल तर मला खूप आवडले.

## ३ Message — संदेश



MUNNA BHAI: Abay Circuit,
Yaar Mere ko Us Sister (Nurse)
se Piyar ho gaya hai.
Love Letter kese likhun.?
Circuit: Simple, BHAI Aap likh dalo I love You Sister.
From: your Munna BHAI..

## ४ Thought — सुविचार



आत्मसंयम, आत्मजाणीव आणि आत्म-सुधारणा ही तीन गुण ज्याच्यापाशी आहेत त्याने जग जिंकले असे समजावे.
– टेनिसन


**संस्कृत सुभाषित**

**अतिक्रान्तं हि यत्कार्यं पश्चाचिंतयते नरः**
**तच्चास्य न भवेत्कार्यं चिंतया च विनश्यति ।**

(कर्णपर्व, अध्याय ३१, ोक २९ महाभारत)

अर्थ : घटना घडून गेल्यानंतर मागाहून जो चिंता करीत बसतो, त्याचे कार्य तर होत नाहीच, पण चिंतेने नाश मात्र होतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. सत्तेचा खेळ
४. 'ज्याने चोच दिली -- -- देईल' (म्हण)
७. पर्ण
९. कूर्म
१२. उष्ण
१४. बाहक भीती निर्माण करणाऱ्या दोन छायाग्रहांपैकी एक
१५. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
१८. पृथ्वी
१९. घाई, निकड
२१. पोपटासारखे नाक
२२. हावरटपणा
२४. मराठीत परमेश्वर, हिंदीत हिरवट, इंग्रजीत घाई
२५. फळातील द्रव
२७. युद्ध
२९. वर्ष (ग्रा.)
३२. फार मोठा फायदा
३५. मर्कट
३७. अखेर, शेवट
३८. कीर्तनकार
४१. घराण्याचे नाव कलंकित करणारा
४४. संरक्षक भिंत
४५. फुरसत
४७. लग्न म्हणजे दोनाचे – हात!
४८. लहान मुलांची शाळा
५१. दणकट
५३. रममाण, निमग्न
५५. दृष्टीभेट
५७. सरस्वतीचे एक नाव
५८. नमस्कार
६०. चणचण, न्यूनता
६३. आरास
६५. पोट
६६. हिंदीत श्रावण महिना
६७. अदबशीरपणा
६८. होडी
६९. एक श्वासरोग
७१. गोदाम
७३. चंद्र
७४. सैन्य
७६. एकरूप
७८. झाडावरून गळलेले, माघार
८०. पुढारी, नेता
८२. पक्षी
८३. लाकडी जिना
८४. किरकोळ सामान
८६. घोड्याचे पायताण
८७. मंत्रीमंडळ
८८. चिवट
८९. टिंगल, चेष्टा
९०. वितरण

## उभे शब्द

१. संताप
२. भरजरी
३. 'इडली आणि ऑर्किड' चरित्र या उद्याजकाचे- 'विठ्ठल ---'
४. नखरा
५. सर्वत्र
६. मनाचे ोक लिहिणारे संत
७. साखरेचा रस
८. आश्चर्य
१०. पातळसर
११. व्रत
१४. मातीचा कण
१६. मऊ
१७. मच्छर
२०. कोवळा अंकुर
२३. अंगावरील बारीक केस
२४. आक्षेप
२६. मनाला लागलेली टोचणी
२८. रमापती
३०. सडपातळ
३१. कुबड
३३. गालफड आत गेलेला
३४. स्तुती
३६. मणका
३९. सरळ, न थांबता
४०. अस्वल
४२. मिंधा
४३. वर्ष, सन
४६. चेहरा, मुख
४८. गोणपाट, पोते
४९. उत्तराधिकारी
५०. संध्याकाळ
५१. डोंगराची काळी मैना
५२. खोदकाम
५३. अनुमती
५४. नुकतेच जन्मला आलेले
५६. कणखर, रांगडा
५९. प्रत्येक दिवशी
६१. माकडांची टोळी
६२. एक तारवाद्य
६४. वरपांगी, दिखाऊ
६५. पार्वतीचे एक नाव
६६. सामन्यातील पराक्रमी
६९. किंमत, प्रत्येक
७०. अफूचे बीज
७२. लोकसभेच्या सदस्य
७३. विपत्तीची कहाणी
७५. सर्वनाश, नेस्तनाबूत
७७. सुसर
७८. उद्याच्या नंतरचा दिवस
७९. पादत्राण
८१. केस रंगवण्याचे साधन
८४. आंचळ
८५. भेग, चिर, सापट

## आडवे उत्तरे

१.राजकाज ४.तोच चारा ७.पान ९.कासव १२.गरम १४.राहू १५.मनकवडा १८.रसा १९.तातडी २१.बाकदार २२.लसलस २४.फार २५.रस २७.समर २९.वरीस ३२.लखलाभ ३५.माकड ३७.तड ३८.कथेकरी ४१.लाजलावणा ४४.तट ४५.सवड ४७.चार ४८.बालवाडी ५१.कणखर ५३.पर ५४.रत ५५.नजरानजर ५७.शारदा ५८.वंदन ६०.वानवा ६३.सजावट ६५.उदर ६६.सावन ६७.नम्रता ६८.तर ६९.दमा ७१.वखार ७३.रजनीनाथ ७४.सेना ७६.समरस ७८.पड ८०.नायक ८२.खग ८३.दादर ८४.सटरफटर ८६.नाल ८७.सरकार ८८.वातड ८९.टर ९०.वाटप

## उभे उत्तरे

१.राग २.जरतारी ३.कामत ४.तोरा ५.चहुबाजूला ६.रामदास ७.पाक ८.नवल १०.सरसरीत ११.वसा १४.रज १६.नरम १७.डास २०.डीर २३.लव २४.हरकत २६.सल २८.रमावर ३०.सडसडीत ३१.पोक ३३.खप्पड ३४.भलावण

# चंदेरी दुनिया

## रश्मिका-विजयने चाहत्यांना दिली आनंदाची बातमी; लग्नाबद्दल...


रश्मिका-विजयने चाहत्यांना दिली आनंदाची बातमी; लग्नाबद्दल...
मुंबई: रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा यांच्या लग्नाच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून समाज माध्यमांमध्ये सुरू आहेत. अखेर रश्मिका आणि विजय दोघांनीही अधिकृतरित्या लग्नाबाबतची माहिती सोशल मीडियाद्वारे चाहत्यांना दिली आहे. चाहत्यांनी या जोडीला विरोश असे नाव दिलं होतं. याचाच उल्लेख त्यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये केला आहे.
सोशल मीडिया पोस्टद्वारे दिली माहिती रश्मिका आणि विजयने आपापल्या इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत लग्नाची माहिती दिली आहे. या पोस्टमध्ये लिहिले आहे की, प्रियजनांनो, कोणतीही योजना आखण्यापूर्वी किंवा स्वतःसाठी काहीही निवडण्यापूर्वी, तुम्ही आधीपासूनच आमच्या सोबत होता. इतक्या प्रेमाने तुम्ही आम्हाला एक नाव दिले. तुम्ही आम्हाला 'विरोश' म्हणून संबोधले. म्हणूनच आज पूर्णपणे मनापासून आम्ही तुमच्या सन्मानार्थ आमच्या या मिलनाला एक नाव देत आहोत. 'विरोशचं लग्न' असे या सोहळ्याला नाव द्यायला आम्हाला आवडेल. इतक्या प्रेमाने आमची साथ दिल्याबद्दल धन्यवाद.
विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदानाचं लग्न कधी होणार आहे?
विजय आणि रश्मिकाने आपल्या पोस्टमध्ये लग्नाची तारीख सांगितलेली नाही. पण मीडिया रिपोर्ट्सनुसार हे जोडपं २६ फेब्रुवारी २०२६ रोजी राजस्थान येथील उदयपूर शहरामध्ये लग्न करणार आहेत. लग्नसोहळ्यासाठी कपलने एक शाही महालाची निवड केली आहे, जेथे केवळ कुटुंबातील सदस्य आणि जवळचे मित्रपरिवार सहभागी होतील. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी दोघांनाही एअरपोर्टवर पाहिले गेले, ज्यावरून रश्मिका आणि विजय लग्नासाठी उदयपूरच्या दिशेनं प्रवास करत असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता.



## राजपाल यादव चेक बाऊन्स प्रकरणात नवा ट्विस्ट, अमिताभ बच्चनच्या नावाने...



मुंबई: चेक बाऊन्सच्या जुन्या प्रकरणामुळे बॉलिवूड अभिनेता राजपाल यादव सध्या अडचणीत आला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने त्याला अंतरिम जामीन मंजूर केला अस या खटल्यात आता एक खळबळजनक वळण आलं आहे. राजपालच्या वकिलांनी केलेल्या दाव्यानुसार, या संपूर्ण वादाची मुळे २०१२ मधील एका चित्रपटाच्या म्युझिक लाँच इव्हेंटमध्ये आहेत. ज्यामध्ये अमिताभ बच्चन उपस्थित राहणार होते. हे प्रकरण समोर आल्यानंतर वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहेत.
राजपाल यादवचे वकील भास्कर उपाध्याय यांनी सांगितले की, अता पता लापता चित्रपटाच्या म्युझिक लाँचला अमिताभ बच्चन येणार होते. या कार्यक्रमात तक्रारदार माधव गोपाल अग्रवाल यांना बच्चन यांच्यासोबत स्टेज शेअर करायचा होता. मात्र, राजपालच्या टीमने याला नकार दिला. यामुळे नाराज झालेल्या तक्रारदाराने चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्याची मागणी करत न्यायालयात धाव घेतली. तेव्हापासून हा कायदेशीर संघर्ष सुरू झाला असा दावाच राजपाल यादव यांचे वकील भास्कर यांनी केला आहे.
पाच कोटींच्या मूळ कर्जाचे रूपांतर व्याजासह कोट्यवधींच्या देणीत झाले आहे. २०१६ मध्ये न्यायालयाने १०.४० कोटींची देयता निश्चित केली होती. याप्रकरणी २०१८ मध्ये राजपालला दोषी ठरवून ११.५ कोटींचा दंड आणि तीन महिन्यांची शिक्षा सुनावण्यात आली होती. मात्र, जुन्या चेकचा गैरवापर केल्याचा दावा आता राजपालच्या कायदेशीर पथकाकडून केला जात आहे.
वकिलांच्या मते, २०१२ मध्ये एका कार्यक्रमात अमिताभ बच्चन निमंत्रित होते. तक्रारदार अग्रवाल यांनाही त्यांच्यासोबत व्यासपीठावर स्थान हवे होते. पण राजपालने त्यास नकार दिला होता.
कारण बच्चन हे कोणत्याही व्यावसायिक फायद्याशिवाय तिथे आले होते. या एका नकारामुळे तक्रारदाराने थेट चित्रपट रोखण्यासाठी कोर्टात धाव घेतली होती असं राजपालच्या वकीलांचे म्हणणे आहे. राजपालने पाच कोटींचे कर्ज घेतले होते आणि त्या बदल्यात चेक दिले होते. मात्र, नवीन करार झाले असतानाही जुन्या चेकचा वापर करून तक्रारदाराने अडकवल्याचा आरोप राजपालच्या टीमने केला आहे. सध्या राजपालला जामीन मिळाला असला, तरी ही नऊ कोटींची कायदेशीर लढाई आता कोणत्या वळणावर जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## खामोश शब्द वापराल तर..., मुंबई उच्च न्यायालयाने घातली बंदी

मुंबई: मुंबई उच्च न्यायालयाकडून दिग्गज अभिनेते आणि राजकारणी शत्रुघ्न सिन्हा यांना मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, त्यांचा गाजलेला 'खामोश' हा शब्द आणि त्यांची ओळख पूर्णपणे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा भाग आहे. त्यामुळे त्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या नावाचा फोटोचा किंवा संवादांचा व्यावसायिक वापर करण्यास न्यायालयाने मनाई केली आहे. शत्रुघ्न सिन्हा यांनी खामोश प्रकरणात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. १६ फेब्रुवारी रोजी शत्रुघ्न सिन्हा यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांनी अंतरिम आदेश दिला. न्यायालयाने स्पष्ट केलं की, सिन्हा यांची संवाद फेकीची शैली आणि विशेषतः 'खामोश' हा शब्द त्यांच्या सिनेमॅटिक ओळखीशी जोडलेला आहे.
त्यामुळे उच्च न्यायालयाने विविध वेबसाईट आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना आदेश दिले आहेत की, सिन्हा यांच्या संमतीशिवाय त्यांचा वापर करून तयार करण्यात आलेला मजकूर त्वरित हटवण्यात यावा. तसेच भविष्यात असा कोणताही मजकूर अपलोड करण्यास बंदी घातली आहे. न्यायालयाने म्हटलं आहे की, सध्याच्या डिजिटल युगात सेलिब्रिटींच्या ओळखीचा चुकीचा वापर वाढला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (-ख) मुळे एखाद्याचे नाव, आवाज किंवा शैली वापरून बनावट गोष्टी तयार केल्या जात आहेत, ज्यामुळे त्या व्यक्तीच्या प्रतिमेला तडा जाऊ शकतो.


## प्राइम व्हिडिओवरील आगामी 'सूबेदार' च्या ट्रेलरने जिंकले अनुपम खेर यांचे मन

मुंबई : दिग्गज अभिनेते अनुपम खेर यांनी आपल्या जिवलग मित्र अनिल कपूर यांच्या आगामी 'सूबेदार' चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यानंतर एक अतिशय भावूक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यांनी सांगितले की, जग पाहण्यापूर्वी आपल्या मित्राचे काम पाहणे ही त्यांच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. ट्रेलर पाहून ते खूप प्रभावित झाले असून त्यांनी त्याला अतिशय शानदार पद्धतीने बनवलेला असे म्हटले आहे.अनिल कपूर यांच्या बदललेल्या अंदाजाचे कौतुक करताना ते म्हणाले, कपूर साहेब, आपण स्वतःला काय अप्रतिम री-इन्व्हेंट केले आहे! तसेच हा ट्रेलर पाहून ते खूप प्रेरित झाल्याचेही त्यांनी नमूद केले. दिग्दर्शक डीशीह ढीर्ळींशपळ यांच्या कामाचेही त्यांनी विशेष कौतुक केले आणि प्रेक्षक ही फिल्म पाहतील याची ते उत्सुकतेने वाट पाहत असल्याचे सांगितले.




'सूबेदार'चे दिग्दर्शन सुरेश त्रिवेणी (डीशीह ढीर्ळींशपळ) यांनी केले असून, या चित्रपटाची निर्मिती विक्रम मल्होत्रा, अनिल कपूर आणि सुरेश त्रिवेणी (तळज्ञीरा चरश्रर्हीीर, -पळश्र घर्ोी, डीशीह ढीर्ळींशपळ) यांनी केली आहे. हा चित्रपट 'ओपनिंग इमेज फिल्म्स'ने (जशिपळपस खारसश ऋळश्री) अनिल कपूर फिल्म अँड कम्युनिकेशन नेटवर्क (-पळश्र घर्ोी ऋळश्रा उेाांपळलरींळेप छशींुेीज्ञ) यांच्या सहकार्याने तयार केला आहे.
या चित्रपटात अनिल कपूर आणि राधिका मदन या मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. तसेच सौरभ शुक्ला (डरीरलह डर्हीज्ञश्र), आदित्य रावल (-वळींर ठर्रुश्र), फैझल मलिक (ऋरळीरश्र चरश्रळज्ञ) आणि मोना सिंह (चेपर डळपसह) यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत.'सूबेदार'चा प्रीमियर ५ मार्च रोजी विशेषतः अमेझॉन प्राइम व्हिडिओ (-ाेंझ्रेप झीळाश तळवशे) इंडिया वर होणार आहे. हा चित्रपट भारतासह जगभरातील २४० हून अधिक देशांमध्ये हिंदी, तमिळ आणि तेलुगू भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

कामाख्या नारायण सिंह यांनी त्याला सडेतोड उत्तर देत मानसिकदृष्ट्या कमकुवत असल्याची टीका केली.
त्यांनी स्पष्ट केले की वाद संमती आणि बळजबरीवर आधारित असावा, न की खिचडी किंवा गोमांसवर.
'द केरळ स्टोरी २' या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाल्यापासून तो वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. ट्रेलरमधील एका सीनमध्ये एका मुस्लीम कुटुंबाने अभिनेत्रीला बळजबरीने गोमांस खायला देण्याचे दृश्य दाखवले आहे, ज्यावर बॉलिवूड दिग्दर्शक अनुराग कश्यपने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. अनुराग कश्यपने या चित्रपटाला प्रचारकी असल्याचा आरोप करत 'पूर्णपणे बकवास' आहे' असे म्हटले. त्यांनी म्हटले की, 'गोमांस तर दूर राहिलं, पण कोणी अशाप्रकारे कोणाला खिचडीसुद्धा बळजबरीने खायला घालत नाही.'
यावर उत्तर देताना 'द केरळ स्टोरी २'चे दिग्दर्शक कामाख्या नारायण सिंह यांनी सडेतोड विधान केले. त्यांनी एक्स (ट्विटर) अकाऊंटवर एक व्हिडीओ पोस्ट केला आणि अनुराग कश्यपवर मानसिकदृष्ट्या कमकुवत असल्याची टीका केली.
कामाख्या नारायण यांनी व्हिडीओत म्हटले, 'अनुरागने पूर्वी 'दॅट गर्ल इन यलो बूट्स' हा चित्रपट बनवला होता, ज्यामध्ये एका वडिलांचे लेकीसोबत अनैतिक संबंध दाखवले होते. हे एका सभ्य




समाजाच्या विचारांच्या पलीकडचं आहे. परंतु अनुराग मानसिकदृष्ट्या कमकुवत झाले आहेत आणि समाजाने आता त्याच्याकडे गांभीर्याने पाहणं सोडून दिलं आहे. गेल्या काही वर्षांपासून त्याचे चित्रपट फ्लॉप होत आहेत. मी देवाकडे प्रार्थना करतो की त्याला अक्कल द्यावी. 'द केरळ स्टोरी २' हा चित्रपट तथ्यांवर आधारित आहे.'
व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये कामाख्या नारायण यांनी लिहिले, 'प्रिय अनुराग सर, मुद्दा चित्रपटातील दृश्यांचा किंवा खिचडी, गोमांसचा नाही. खरा प्रश्न संमती आणि बळजबरीचा आहे. तुम्ही एखाद्याला त्यांच्या इच्छेविरुद्ध खिचडी खाण्यास भाग पाडू शकत नाही. त्यामुळे जर एखादा चित्रपट बळजबरीने धर्मांतर किंवा दबावाचा मुद्दा उपस्थित करत असेल, तर त्याविरोधात द्वेष पसरवणं हा बौद्धिक अप्रामाणिकपणा आहे. वादविवाद हा तथ्ये आणि आकडेवारीवर आधारित असावा.'
या वक्तव्यामुळे सोशल मीडियावर 'द केरळ स्टोरी २'वर सुरु असलेला वाद पुन्हा चर्चेत आला आहे. अनेक प्रेक्षकांनी दिग्दर्शक कामाख्या नारायण यांचा पाठिंबा दर्शवला तर काहींनी अनुराग कश्यपच्या टीकेवर मत व्यक्त केले. यामुळे चित्रपटाच्या ट्रेलर आणि संबंधित सीनवर चर्चा जोर धरत आहे.
विशेष म्हणजे, या वादामुळे चित्रपटाच्या मुद्द्यावर सामाजिक जागरूकता निर्माण होण्यासही मदत झाली आहे. बलजबरी, संमती आणि धार्मिक/सांस्कृतिक संवेदनशीलतेवर आधारित या चर्चेमुळे प्रेक्षक आणि चित्रपट समीक्षक दोघांनाही या मुद्द्यावर विचार करण्याची संधी मिळाली आहे.


## पापी पेट का सवाल है...

जीवनदर्शी कथा, राजभूषण सहस्रबुद्धे

पापी पेट का सवाल है
रोटी से बच के निकल जाये कोई
जमाने में किस की मजाल है?
सबका एक जैसा हाल है
पापी पेट का सवाल है...

राजेश खन्ना यांच्यावर चित्रीत 'पापी पेट का सवाल है' (१९८४) चित्रपटातील किशोरकुमार यांचे हे गीत सजीव प्राण्यांची विवशता अधोरेखित करते. जीवनात पोटासाठी काय काय करावे लागते. विशेषतः मानवाला या पोटासाठी कधी पापकर्म करावे लागते तर, कधी पापी पोटासाठी कर्म करावे लागते. हे वैश्विक सत्य आपल्याला ब्राझिलच्या एडढजचअ-ऋज (२००७) या चित्रपटात पाहायला मिळते.
रायमुंडो नानेटो हा एक तरुण ब्राझिलच्या मागास अशा उत्तर प्रांतातून क्युरितबा या शहरात कामधंद्यासाठी येतो. भुकेल्यापोटी एका छोट्याशा उपहारगृहात थोडेसे खातो; पण पैसे नसल्याने मालक झुल्मिरो त्याच्याकडून भांडी घासून घेतो. नंतर त्याला तेथेच आचारी म्हणून कामावर ठेवतो; पण पगाराचे नाव नाही काढायचे. दोन वेळचे जेवण आणि रात्री पाठ टेकायला स्वयंपाकघराचा कोपरा देतोय तेच उपकार! नानेटो तेथेच स्वादिष्ट पॅटीस, कटलेट बनवायला शिकतो. हळूहळू उपहारगृहाला चांगले दिवस येतात. एकदा तिथे खादाड इरिया (वेश्या) येते. नानेटोचे हातचे पदार्थ खाऊन खुश होते. इतकी की, त्या रात्री स्वयंपाकघरातच नानेटोबरोबर मुक्काम ठोकते आणि मध्यरात्री उठून चोरुन नानेटोचे हातचे पॅटीस खाते.
एके दिवशी झुल्मीरोच्या उपहारगृहात एका मोठ्या इटालियन उपहारगृहाचा पैसे कमवणे हेच ध्येय असणारा मालक जिओवानी येतो. नानेटोच्या हाताचा स्वाद पाहून तो त्याला त्याच्याकडे नोकरी करण्याचा प्रस्ताव ठेवतो आणि प्रत्यक्ष पगारही देईन, सोबत तो त्याला अजून उत्तम पाककला देखील शिकवेल. नानेटो लगेच मान्य करतो.
हळूहळू नानेटो जिओवानीकडून पाक कला आणि त्याचे जीवनात असणारे महत्त्व जाणून घेत असतो. सोबत त्याच्या मनात इरियाचे महत्त्वही वाढत असते. आणि तो इरियाला लग्नाची मागणी घालतो; पण इरिया तितकी गंभीर नसते आणि एकदा तो इरियाला जिओवानी सोबत नको त्या अवस्थेत पाहतो आणि त्याच्या संयमाचा बांध तुटतो आणि तो दोघांची निर्घृणपणे हत्या करतो.
आता इथून पुढे स्वयंपाकघर नाही तर, तुरुंगातील भयानक वातावरणात नानेटोला राहावे लागणार असते. म्हणून, तिथे टिकून राहण्यासाठी नानेटो थोडे गुंडांसारखेच 'नानेटो छोटाचाकू' असे स्वतःचे नामकरण करुन वावरतो. ज्या कोठडीत तो राहतो, तेथे एक खतरनाक गुंड बुजू आणि त्याची टोळी असते. तुरुंगात बुजूची दहशत असते आणि एक प्रकारची पदांची स्तरव्यवस्था. तेथील निकृष्ट जेवणाबाबत सर्वजण नाखुश असतात. नानेटो तो स्वतः चांगला आचारी असल्याने जर त्याला काही मसाले देण्याची व्यवस्था केली तर, त्यांना त्या निकृष्ट जेवणात स्वाद निर्माण करुन देण्याचे आश्वासन देतो. बुजू सर्व व्यवस्था करुन देतो. आता आपल्या पाक कौशल्याने नानेटो तेथे स्वतःचे अबाधित स्थान निर्माण करतो.
एकदा तेथे गुंडांचाही दादा असा एट्सेट्रा येतो. तेव्हा त्याला उत्तम मेजवानी देण्यासाठी बुजू नानेटोला सांगतो. नानेटो खूप मेहनत घेतो. त्याचे खूप कौतुक होते; पण मग हळूहळू नानेटोला त्या टोळीच्या स्तर व्यवस्थेच्या शिखरावर जाण्याची लालसा निर्माण होते. तो बुजूला विष देऊन मारुन टाकतो आणि त्याच्या स्थानी पोहोचतो. तेही एट्सेट्राची जागा बळकावण्याचे स्वप्न बाळगतच.
असे हे साधे सरळ कथानक; सपक वाटते ना? पण नाही. मार्कोस जॉर्जने ते इतक्या उत्कंठावर्धक पद्धतीने एखाद्या झणझणीत थाळीसारखे सजवून वाढले आहे की, ११० मिनिटे कशी संपतात तेच समजत नाही.
त्यासाठी त्याने नानेटोचे आयुष्य एकरेषीय न करता दोन समांतर कालखंडात मांडले आहे. एक त्याच्या आचारी म्हणून यशस्वी कारकिर्दीचा, तर दुसरा एका कैद्याचे तुरुंगवासातील निर्ढावलेपणाचा. ज्यात पहिले दृश्य नानेटोचे शहरात येणे आणि दुसरे दृश्य तुरुंगात प्रवेश करणे आणि येथून एक आड एक दृश्यरचनेमुळे आणि त्यातील समानता दर्शवत सादरीकरणाने शेवटपर्यंत गूढ शिल्लक राहते की, हा भोळाभाबडा, हसमुख नानेटो तुरुंगात गेलाच तरी कसा? आणि गेला तरी गुंडांच्या टोळीचा प्रमुख बनण्याची कल्पना त्याच्या पोटात शिजलीच कशी?
'इस्टोमगो' म्हणजे पोर्तुगीज भाषेत 'पोट' आणि चित्रपटाची आंतरराष्ट्रीय ओळख आहे (- अ ऋरींीीपोळल ड्रींू) भोजन संस्कृतीची कथा'. इतर सजीवांप्रमाणेच माणसाच्या हृदयाचा, सुखाचा मार्ग पोटातूनच जातो. उत्तम भोजन ही प्रत्येकाची भूक असते. मग, त्या उत्तम भोजनाद्वारेच एक सामान्य आचार्याच्या पोटात ढवळाढवळ होऊन एक घृणास्पद गुन्हा करण्यास तो प्रवृत्त होतो, पाककौशल्याद्वारे गुन्हेगारांच्या उच्चपदाला पोहोचतो. त्या रुपांतराचे माध्यम म्हणून 'पोट' हे उचित शीर्षक त्यास प्राप्त झाले.
पण चित्रपटाचे केवळ इतके साधे उद्दिष्ट नाही तर, 'भोजन' हे सत्ताप्राप्तीची भूक आणि समाजावर, इतरांच्या मनावर नियंत्रण मिळवण्याचे साधन, चलन म्हणून वापरले आहे. स्वयंपाकघर आणि कोठडी ही निर्दयी समाजरचनेची, शोषण व्यवस्थेची दोन प्रतिके आहेत. जिथे एक छोटासा सशक्त वर्ग, विशाल आणि दूर्बल समाजावर राज्य करतो. एक वर्ग शोषण करणारा जो आदेश देऊन इच्छापूर्ती करुन घेतो. तर दुसरा शोषित जो आदेश ऐकून सेवा देतो. इथे इतर समाजाप्रमाणेच झुल्मिरो, बुजू सारखे लोक नानेटोचे शोषण करतात तर नानेटो, जिओवानी सारखे इरियाचे.
राहिला प्रवास नानेटोच्या गुंडांचा म्होरक्या बनण्याच्या प्रेरणेचा तर जुल्मिरोकडून पाककृतींची तोंडओळख होता-होता, 'या समाज सागरात बुडून मरण्याऐवजी तरुन जगा'. हा मूलमंत्र शिकतो. तर जिओवानीकडून 'पाककौशल्यासोबत आपल्या कलाकौशल्याची योग्य कदर होणे गरजेचे' हे तंत्र आणि या दोघांमध्ये इरियाचे सौंदर्य उपभोगण्यासाठी उत्तम भोजनाचा उपयोग.
यात खाद्यपदार्थांची देखील तितकीच महत्त्वाची भूमिका. झुल्मिरोकडून नानेटो साधे सोपे पॅटीस शिकतो ते प्रामाणिक, साधेसरळ जीवन जगण्यासाठी. जिओवानी कडून उच्च राहणीमानाची आस निर्माण करणारे इटालियन पदार्थ स्पागेती, तर तुरुंगात कठीण परिस्थितीतही तगण्यासाठी जुगाड, कल्पकतेने जसा कोंड्याचा मांडा तसा तो मुंगळ्यांचा उपमा.
चित्रपटात खाद्यपदार्थांच्या बनवण्याची समीपदृश्ये शृंगारीक पार्श्वसंगीतासह जितकी सुंदर, मोहक, भूक जागवणारी तितकीच इरियाची काही दृश्ये भारतीय समाजाच्या पचनी न पडणारी आहेत. ती पाहून मन विदीर्ण होऊन जाते. उदाहरणार्थ, एकदा इरियासोबतच्या नाजूक क्षणी नानेटो शारीरिक भूक भागवत असताना बिछान्यावरच इरिया आधाशासारखी आपली पोटाची भूक भागवत असते. हे पाहून अंगावर काटा येतो कारण मनापेक्षा तनाची भूक नेहमीच महत्त्वाची ठरत आली आहे.
जो मिगेल(नानेटो)चा अभिनय प्रेक्षकांना भोळसट आचारी ते धूर्त आणि निर्मम कैद्यापर्यंतच्या प्रवासात अगदी सहजपणे भूक वाढवत नेतो. सोबत शोषितांचे प्रतिक फबिओ नासिमेंटो (इरिया) च्या मुक्त सौंदर्याचा मसाला आणि वेनोस्टा यांचा उत्तम पार्श्वसंगीताचा तडका आणि लुका अल्वेर्दीचे विपरीत संकलनाच्या दृश्य सजावटीद्वारे चित्रपटरसिकांची भूक भागवणारी मार्कोसने वाढलेली ही उत्तम चित्रपाक कलाकृती थाळी ब्राझिलचे अनेक पुरस्कार विजेती ठरली हे खरे. परंतु, उच्चपदी स्थानापन्न बनल्यानंतर नानेटोचे राज्य कसे असेल? तो न्यायाने प्रेमाने वागेल की, विकृति वाढत जाईल? हे जाणण्याच्या मिठाईची अपेक्षा मात्र अपूर्ण राहते.
पण एक गोष्ट सातत्याने अस्वस्थ करते की, पाश्चात्य समाजातील पापी पोटाचे नग्न सत्य जितक्या सहजतेने रुपेरी पडद्यावर उमटते तितके आपल्याकडे दर्शवण्यावर प्रतिबंध असतात. भारतीय समाजातही असे लोक, अशा वृत्ती, घटना, गुन्हे प्रत्यक्षात घडत असतात; पण आपण ते पाहू इच्छित नाही. अथवा समजून घेण्याची प्रगल्भता समाजात आलेली नाही. सेंसॉर प्रमाणपत्राने समाजातील अशा निर्दयी, स्वार्थी, वखवखलेल्या आधाशी प्रवृत्तीवर आपण अद्यापि नियंत्रण नाही मिळवू शकलो. शेवटी हे सर्व पाहिल्यावर सजीवांची भूकेमुळे होणारी हतबलता स्पष्ट करणारा रोटी(१९७३) चित्रपटातील कादरखान लिखित राजेश खन्ना यांनीच मृत्युप्रसंगी म्हटलेला संवाद मनात घुमत राहतो.

मै भगवान को ढुँढ निकालुँगा और उसे कहुँगा
इन्सान को दिल दे जिस्म दें दिमाग़ दें
लेकिन ये कम्बख्त 'पेट' मत दें
पेट देता हैं तो उसे 'भूख' मत दें
भूख देता है तो उस के
दो वक्त की रोटी का इंतजाम कर के भेज
वर्ना तुझे इंसान को
पैदा करने का कोई हक नहीं है



# सिध्देश्वर मंदीर परिसर माऊलीच्या जयघोषणाने दुमदुमला

## संत ज्ञानेश्वर आणि तुकाराम महाराजांसह सात पवित्र पादुकांचे मंदिरात झाले पुजन







**लातूर/प्रतिनिधी :** लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थानात वारकरी संप्रदायाचे प्राण मानले जाणारे संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरु तुकाराम महाराज, संत जनाबाई यांच्यासह सात संतांच्या पवित्र पादुकांचे आज पुजन करण्यात आले. यावेळी सिध्देश्वर मंदीर परिसरात माऊलीच्या जयघोषाने दुमदुमुन गेला होता. या पादुका पुजनप्रसंगी मदीर परिसरात हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. या सोहळ्यात मंदीरासह परिसरात असंख्य वारकरी व भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या पादुका पुजनास ह.भ.प. छोटे कदम माऊली, देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर, जिल्हा पोलिस अधिक्षक अमोल तांबे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नहे, मनपा उपायुक्त पंजाबराव खानसुळे, नायब तहसीलदार सुधीर देशमुख यांच्यासह मंदीराचे विश्वस्त यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज शष्टशतकोत्तर अमृत महोत्सवी संजिवनी समाधी सांगता, श्री संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर जन्मोत्सव सांगता सोहळा आणि जगद्गुरु तुकाराम महाराज त्रिशकतोत्तर अमृत महोत्सवी वैकुंठगमन सांगता सोहळ्यानिमित्त लातूरात वारकयांचा मेळा भरला आहे. या निमित्ताने संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज व संत जनाबाई यांच्या पादुकांचे आगमन शनिवार दि. २१ फेब्रुवारी रोजी हेलिकॉप्टरने झाले. सर्वप्रथम या पादुका लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर मंदिरात दुपारी ११ वाजण्याच्या सुमारास आल्या. यानिमित्ताने या पादुकांचे पुजन देवस्थानच्या वतीने करून महाआरती करण्यात आली. यावेळी पादुकांचे पुजन होत असताना मंदीर परिसरात हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. सदर सोहळ्यासाठी लातूर शहरासह जिल्हाभरात वारकरी संप्रदायातील वारकरी भक्त व शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सदर पादुकांचे स्वागत करण्यासाठी मंदीर परिसर आकर्षक फुलांनी सजविण्यात आला होता. पादुकांचे आगमन मंदीरात होताच पादुकांवर पुष्पवृष्टी करण्यासाठी अनेक महिला पारंपारिक वेशभूषेत उपस्थित होत्या. तसेच छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांची वेशभूषा केलेले लहान मुलेही यात सहभागी झाली होती.पादुकांचे पुजन झाल्यानंतर श्री सिध्देश्वराची महाआरती करण्यात आली.

या सोहळ्यासाठी उपस्थित असलेले उपविभागीय अधिकारी रोहिणी नहे, पोलिस अधिक्षक अमोल तांबे यांचा देवस्थान समितीच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. हा सोहळा यशस्वी पार पाडण्यासाठी सिध्देश्वर मंदीराचे विश्वस्त अशोक भोसले, रमेशसिंह बिसेन,व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे आदींसह देवस्थानचे स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकयांसह भाविकांसाठी देवस्थानच्या वतीने अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती. या सोहळ्यादरम्यान पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

## एकाच वेळी दोन पेटंट्स प्राप्त करत डॉ. बालाजी कळंबे यांची दुहेरी कामगिरी



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. बालाजी गुरुनाथ कळंबे यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत सलग दोन डिझाइन नोंदणी प्रमाणपत्रे मिळवली आहेत. भारत सरकारच्या द पेटंट ऑफिस, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया कडून त्यांच्या नावावर दोन स्वतंत्र डिझाइन्सची नोंदणी करण्यात आली आहे.

बँकिंग ऑपेरेशन्स मल्टि-अकाउंट मॅनेजमेंट डिव्हाईस आणि डिव्हाईस फॉर ऑटोमॅटेड डिटेक्शन ऑफ फ्राऊडलेंट फायनान्सिल ट्रांज्यशन यांचा समावेश आहे. ही दोन्ही डिझाइन्स बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रातील तांत्रिक कार्यक्षमता वाढविणे, बहुखाती व्यवस्थापन सुलभ करणे आणि फसवणूक व्यवहारांचे स्वयंचलित निदान करण्यास उपयुक्त ठरणाऱ्या संकल्पनांवर आधारित आहेत. डिजाईन्स ॲक्ट २००० व नियम २००१ अंतर्गत ही नोंदणी मान्य करण्यात आली आहे.

**शैक्षणिक व संशोधनातील भक्कम वाटचाल**

डॉ. कळंबे हे दयानंद वाणिज्य महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असून त्यांच्या नावावर आता एकूण १० पेटंट्स नोंदणीकृत आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी संशोधन निबंध सादर केले असून शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचा कार्याचा आलेख सातत्याने उंचावत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी पीएचडीचे संशोधन पूर्ण करत आहेत, ही बाबही महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे.

**व्यापक परिणाम**

बँकिंग क्षेत्रातील डिजिटलायझेशन, सायबर सुरक्षा आणि फसवणूक प्रतिबंध यांसारख्या संवेदनशील विषयांवर केंद्रित ही कामगिरी लातूर जिल्ह्यासह मराठवाडा विभागासाठी प्रेरणादायी ठरली आहे. उद्योगशिक्षण क्षेत्रातील दुवा मजबूत करण्यासाठी अशा संशोधनाची मोठी गरज असताना डॉ. कळंबे यांनी केलेले योगदान उल्लेखनीय मानले जात आहे. महाविद्यालय प्रशासन, सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन केले असून, भविष्यातही अशाच नावीन्यपूर्ण संशोधनातून राष्ट्रीय स्तरावर महाविद्यालयाचा गौरव वाढवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# दयानंद विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिराचा शुभारंभ



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद विधी महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिराचा शुभारंभ मौजे भोईसमूद्रा येथे उत्साहात करण्यात आला.

''शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास'' या ब्रिदवाक्याखाली २५ फब्रुवारीपासून सुरू झालेल्या या शिबिरात विविध सामाजिक, कायदेविषयक व प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

उद्घाटन प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते हणमंत गायकवाड व तंटामुक्ती अध्यक्ष रावसाहेब गायकवाड प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांसह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच महाविद्यालयातील प्रा. शितल घुटे व प्रा. अतिश तिवारी यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सात दिवसीय शिबिरातील उपक्रमांची रूपरेषा सादर करण्यात आली.

महाविद्यालयाच्या प्राचार्या तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. पुनम नाथानी आणि प्रा. उमेश काटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी स्वयंसेवकांनी सामाजिक बांधिलकी जपत शिबिर यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

शिबिरातील प्रमुख उपक्रम : अग्निशमन व आणीबाणी सेवा मार्गदर्शन, पर्यावरण संरक्षण, मानवी हक्क जनजागृती, मोफत आरोग्य तपासणी शिबीर, डिजिटल साक्षरता अभियान, करिअर मार्गदर्शन, समाज प्रबोधनपर कीर्तन, मतदान जनजागृती, वृक्षारोपण तसेच पशुवैद्यकीय शिबीर यांसारखे विविध उपक्रम सात दिवसांत राबविण्यात येणार आहेत. या शिबिराच्या माध्यमातून गावकऱ्यांना शैक्षणिक, सामाजिक व आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळणार असून ग्रामस्थांनी या उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले.

# अभ्यासपूर्वक गुंतवणूक केल्यास शेअर बाजार अत्यंत फायदेशीर : डॉ. रूपा गिल्डा

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयात शेअर बाजार गुंतवणुकीवर कार्यशाळा




**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील बँकिंग अँड इन्शुरन्स समितीच्या वतीने ''स्टॉक मार्केट बेसिक्स टू लाईव्ह ट्रेडिंग : अ हँड्स-ऑन वर्कशॉप'' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने होते.

साधन व्यक्ती म्हणून डॉ. रूपा गिल्डा यांनी विद्यार्थ्यांना शेअर बाजारातील गुंतवणुकीविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी बँकिंग अँड इन्शुरन्स समितीचे समन्वयक डॉ. निखिल व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती. ही कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. गिल्डा यांनी सांगितले की, अभ्यासपूर्वक आणि संयमाने गुंतवणूक केल्यास शेअर बाजार अत्यंत फायदेशीर ठरू शकतो. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यापूर्वी संबंधित क्षेत्राचे संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडींचा विविध कंपन्यांवर होणारा परिणाम समजून घेणे गरजेचे असून, कंपन्यांचे ताळेबंद आणि आर्थिक अहवाल तंत्रशुद्ध पद्धतीने अभ्यासणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी नमूद केले. तसेच प्रत्यक्ष व्यवहार (लाईव्ह ट्रेडिंग) करताना जोखीम व्यवस्थापनाचे महत्त्वही त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध शंका उपस्थित केल्या. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना शेअर बाजारातील मूलभूत संकल्पना आणि प्रत्यक्ष व्यवहाराचे ज्ञान मिळाले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक डॉ. निखिल व्यास, डॉ. लता जाधव, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी तसेच प्रशासकीय कर्मचारी राजकुमार माने यांनी विशेष परिश्रम घेतले.

## भीषण अपघातात अहमदाबादमधील एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

गुजरात : उत्तर गुजरातमध्ये रस्ते अपघातांचे सत्र सुरूच आहे. शनिवारी (२१ फेब्रुवारी) सकाळी उंझा - मेहसाणा महामार्गावरील उनावा गावाजवळ हॉटेल कॉम्फीसमोर झालेल्या अपघातात अहमदाबाद कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, कुमावत कुटुंब राजस्थानमधील एका लग्नाला उपस्थित राहिल्यानंतर इको कारने अहमदाबादला परतत होते. उनावाजवळ त्यांच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार वेगाने दुभाजकावर आदळली. धडक इतकी जोरदार होती की कार पूर्णपणे उद्ध्वस्त झाली.

दोन पुरुष, एक महिला आणि एका निष्पाप मुलासह चार जणांचा जागीच मृत्यू झाला. रामलाल लखाजी कुमावत, कोमल मदनलाल कुमावत, कैलाशभाई रामलाल कुमावत आणि एक मुल अशी मृतांची ओळख पटली आहे. कार चालक गंभीर जखमी झाला आहे आणि त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेची माहिती मिळताच उनावा पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आणि पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

# दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयाला SQAAF अंतर्गत 'अ+' श्रेणी प्राप्त



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयास शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्र्वासन आराखडा (SQAAF) अंतर्गत बाह्य मूल्यांकनात 'अ+' श्रेणी प्राप्त करून. राज्यातील गुणवत्तापूर्ण शैक्षणिक संस्थेमध्ये महाविद्यालयाने आपले स्थान अधिक भक्कम केले आहे.

शासनाच्या वतीने राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली होती. त्यानुसार सन २०२४-२०२५ मध्ये राज्यातील १,०२,६७५ शाळांनी स्वयंमूल्यांकन पूर्ण केले. स्वयंमूल्यांकनात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या शाळांपैकी सन २०२५-२०२६ मध्ये १०,७१२ शाळांची बाह्य मूल्यांकनासाठी निवड करण्यात आली होती, त्यापैकी १०,६४४ शाळांचे बाह्य मूल्यांकन पूर्ण झाले.

या प्रक्रियेत राज्यातील निवड झालेल्या शाळांपैकी केवळ ४२९ शाळांना 'अ+' श्रेणी प्राप्त झाली असून, त्यामध्ये दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालय हे लातूर शहरातील एकमेव कनिष्ठ महाविद्यालय ठरले आहे.

महाविद्यालयातील सुसज्ज ग्रंथालय, विद्यार्थ्यांसाठी चहा-पाण्याची सुविधा, वाचन संस्कृतीला प्रोत्साहन, स्मार्ट बोर्डद्वारे अध्यापन, अनाथ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश व गणवेश, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना शुल्क सवलत, आयएएस-आयपीएस अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, विविध सराव परीक्षांचे आयोजन, 'आनंददायी शनिवार'सारखे उपक्रम यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे.

या उपक्रमांचेच फलित म्हणून अनेक विद्यार्थ्यांनी कला, क्रीडा, वक्तृत्व तसेच बारावी बोर्ड परीक्षेत राज्य व देशपातळीवर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. उच्चविद्याविभूषित शिक्षकवर्ग व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण यामुळेच महाविद्यालयास 'अ+' श्रेणी बहाल झाली.बाह्य मूल्यांकन शिक्षण विस्तार अधिकारी श्री. निवृत्ती जाधव, नोडल अधिकारी श्री. किशोर लामतुरे,मु.अ.वखार शेख व श्री. इप्पर सर यांनी केले.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समिती अध्यक्ष श्री. ललितभाई शहा, सचिव श्री. रमेश बियाणी, शालेय समिती सदस्य श्री. उमाकांत केराळे, श्री. दत्तात्रय लोखंडे, श्री. नरेशकुमार पंड्या, संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर. यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, SQAAF समिती सदस्य डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. दिनेश जोशी, प्रा. महेश जंगापल्ले, स्टाफ सचिव प्रा. सुरेश क्षीरसागर तसेच सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# व्हर्व्ह २०२५-२६ : 'स्टुडन्ट ऑफ द इयर' ट्रॉफीचे अनावरण उत्साहात

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयात सहा स्पर्धांमधून गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात 'व्हर्व्ह २०२५-२६' अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर 'स्टुडन्ट ऑफ द इयर' ट्रॉफीचे अनावरण उत्साहात पार पडले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एम. मान्नीकर यांच्या हस्ते या ट्रॉफीचे अनावरण करण्यात आले.

या अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी सहा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन, बिझनेस क्विझ, ॲप्टिट्यूड ॲबिलिटी, टॅली टॅलेंट हंट, ॲड-ओ-मेनिया आणि बेस्ट आऊट ऑफ वेस्ट या स्पर्धांचा समावेश आहे. या सर्व स्पर्धांमधील उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे एका विद्यार्थ्याची 'स्टुडन्ट ऑफ द इयर' म्हणून निवड करण्यात येणार आहे. अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता, सर्जनशीलता आणि व्यावसायिक कौशल्यांना वाव मिळणार असून महाविद्यालयीन परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. पी.एम. मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. जी.आर. लहाने, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण, 'व्हर्व्ह' समन्वयक डॉ. एल. एन. सोनी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. ए.एस. भांजी, प्रा.डी.जे. शेख, डॉ. पी.एस. मुंदडा, प्रा. स्नेहल पाटील, प्रा. प्रसाद पाटील, प्रा. सुहाना शेख, प्रा. क्षितिज कांबळे व प्रा.ज्योती महावरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. महाविद्यालय प्रशासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये 'स्टुडन्ट ऑफ द इयर' पुरस्कार पटकावण्याची चुरस निर्माण झाली असून, स्पर्धांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# अंबुलगा बु. येथे मोफत आरोग्य शिबिरात २०८ रुग्णांची तपासणी

**निलंगा/आयुब बागवान :** निलंगा तालुक्यातील अंबुलगा बु. येथे लातूर येथील स्पर्श हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्श हॉस्पिटलचे मुख्य संचालक डॉ. नारायण नागमोडे यांचे वडील कै. दादाराव नागमोडे यांच्या १३ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित या शिबिरात २०८ रुग्णांची मोफत तपासणी करून त्यांना औषधोपचार करण्यात आले आहेत.

या शिबिराचे उद्घाटन नवनिर्वाचित जि. प. सदस्य चंद्रकांत विठ्ठल होरे आणि माजी पंचायत समिती सदस्य सुभाष म्हेत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी परिसरातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या आरोग्य शिबिरामध्ये विविध आजारांच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची सखोल तपासणी केली. यामध्ये



प्रामुख्याने:लहान बालकांचे आजार व दातांची तपासणी हृदयविकार तपासणी ईसीजी व इतर शुगर आणि बीपी (रक्तदाब) तपासणी शिबिरात सहभागी झालेल्या रुग्णांना मोफत औषधी वाटप करण्यात आले. तसेच, विशेष सवलत म्हणून रक्त व लघवी तपासणीवर ५० टक्के सूट आणि महागड्या औषधांवर २० टक्के सूट देण्यात आली होती.

या मोफत घेण्यात आलेल्या शिबिरामध्ये स्पर्श हॉस्पिटलचे मुख्य संचालक डॉ. नारायण नागमोडे यांच्यासह डॉ. अमोल सूर्यवंशी, डॉ. प्रदीप लेंगरे, डॉ. पंकज धनगे, डॉ. कृष्णा सराटे आणि डॉ. सचिन तुपडीकर यांनी रुग्णांची विशेष तपासणी करून त्यांना पुढील उपचारांसाठी मोलाचे मार्गदर्शन केले.बृसामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण भागातील लोकांसाठी राबवण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल अंबुलगा बु. आणि परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

यावेळी गावातील शांतेश्वर पाटील सुग्रीव सूर्यवंशी बाबू शिंदे वामनराव देशमुख यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

# स्वच्छता हीच खरी देवपूजा आहे - डॉ. दशरथ भिसे



**लातूर/प्रतिनिधी :** संत गाडगेबाबा यांचा विचार केवळ उपदेश नसून तो आचरणात आणणे अत्यावश्यक आहे. समाजसुधारणेसाठी अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षणाचा प्रसार आणि विवेकबुद्धीचा विकास गरजेचा आहे. समाजपरिवर्तनासाठी केवळ शब्द नव्हे तर प्रत्यक्ष कृती, विवेकबुद्धी आणि शिक्षण आवश्यक आहे. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता व सामाजिक विषमता दूर करणे हेच संत गाडगेबाबा यांच्या कार्याचे खरे उद्दिष्ट होते, असेही त्यांनी स्पष्ट केले. स्वच्छता हीच खरी देवपूजा आहे. ' - असे मत प्रा. डॉ. दशरथ भिसे यांनी व्यक्त केले. दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाबळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या जयंती दिनाच्या निमित्ताने सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डॉ. भिसे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रारंभी प्रा. ज्ञानदेव कांबळे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्यांनी संत गाडगेबाबा यांच्या शैक्षणिक कार्यावर विशेष भर दिला. त्यांनी सांगितले की संत गाडगेबाबा यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. शाळा, वसतिगृहे व शिक्षणसंस्थांसाठी निधी संकलन करून त्यांनी वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे कार्य केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा उपयोग स्वतःच्या प्रगतीबरोबरच समाजउन्नतीसाठी करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार सांस्कृतिक विभाग प्रा. डॉ. पांडुरंग मुंढे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ. जयदेवी पवार, डॉ. वैशाली माढेकर, प्रा.शितल खोत, प्रा. नंदा खरटमल, डॉ. मीनाक्षी कोंगे, डॉ. अंकिता वाडकर, स्टाफ सचिव प्रा. चंद्रकांत मोरे, प्रकाश मेहकर, डॉ. माधव गायकवाड, प्रा. विवेक गोस्वामी, डॉ.कांतराव पोले, डॉ.सुरेशकुमार कांबळे, प्रा. विवेक कदम, डॉ.अभिजीत बादाडे, डॉ.नरेंद्र देशमुख, डॉ. इंग्रजीत शिंदे, डॉ.अजित भांजी, राजकुमार कांबळे, सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेतील प्रशिक्षितांचा २४ फेब्रुवारीपासून आझाद मैदानावर बेमुदत आंदोलन- कार्याध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर

**लातूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या युवक-युवतींना कायमस्वरूपी रोजगार द्यावा, या मागणीसाठी २४ फेब्रुवारी २०२६ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सहाय्यक संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना माहिती दिली आहे.

पुढे बोलताना बालाजी पाटील चाकूरकर म्हणाले की यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, २०२४-२५ या कालावधीत सुमारे १ लाख २५ हजार युवकांनी शासकीय आस्थापनांमध्ये तर ५० हजार युवकांनी अशासकीय (खाजगी) आस्थापनांमध्ये ६+५ अशा एकूण ११ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे.



प्रशिक्षित युवकांच्या म्हणण्यानुसार, योजना सुरू करताना त्याच आस्थापनांमध्ये कायमस्वरूपी नियुक्ती देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रशिक्षण पूर्ण होऊनही कायमस्वरूपी रोजगाराबाबत ठोस निर्णय झालेला नाही. मागील तीन महिन्यांपासून अनेक युवक पुन्हा बेरोजगारीच्या संकटाला सामोरे जात असल्याचे संघटनेचे म्हणणे असल्याची त्यांनी सांगितले.

या संदर्भात आतापर्यंत राज्यभरात १९ विविध आंदोलने करण्यात आले आहेत. तसेच ५ जानेवारी २०२६ पासून मुंबईतील आझाद मैदानावर श्रीमती भारती जाधव या आपल्या कुटुंबासह बेमुदत आंदोलन करत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

हिवाळी अधिवेशन काळात काढण्यात आलेल्या मोर्चादरम्यान पोलिसांकडून लाठीमार झाल्याचा आरोपही करण्यात आला असून, या घटनेची न्यायालयीन चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली.

प्रशिक्षित युवक-युवतींच्या संघटनेतर्फे राज्य सरकारने वाढता असंतोष लक्षात घेऊन अर्थसंकल्पीय अधिवेशनात कायमस्वरूपी रोजगाराबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा २४ फेब्रुवारीपासून हजारो युवक-युवती कुटुंबासह आझाद मैदानावर बेमुदत उपोषण आंदोलन सुरू करतील, असा इशारा ही बालाजी पाटील चाकूरकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिला आहे.

या पत्रकार परिषदेस जिल्हाध्यक्ष अनिकेत मांदळे जिल्हा कार्यकारणी प्रमुख गोविंदराव टोम्पे, धीरज गुरमे, रवींद्र एकंबे, रवी भोसले, उमेश कांबळे, संतोष ढोबळे, विष्णू वैद्य, सुशील सिरसाठे, माळी मोनिका, तानाजी कांबळे, बळीराम विभुते, प्रवीण , शितल अष्टोरे, स्नेहा कोरे, वृंदा जाधव आदींची उपस्थिती होती.

## आधारभूत किंमतीचा लाभ घेण्यासाठी २७ फेब्रुवारीपर्यंत सीसीआय खेरदी केंद्रावर कापूस विक्री करावी

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून चालू पीक वर्ष २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किमतीमध्ये (एमएसपी) कापूस खरेदी करण्याची अंतिम तारीख २७ फेब्रुवारी, २०२६ निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे कपास किसान पवर नोंदणीकृत असलेल्या सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी किमान आधारभूत किंमतीचा लाभ घेण्यासाठी लवकरात पव्दारे स्लॉट बुक करून २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत जवळच्या सीसीआय खरेदी केंद्रावर आपला कापूस विक्री करावा, असे लातूर येथील सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक यांनी कळविले आहे.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्यूत काम**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, सामान्य, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत. **निविदा क्रमांक:** SUR/L/T/2024/30R3. **कामाचे नाव:** वाडी यार्डचे अ वर्ग मालवाहतूक परीक्षा यार्डमध्ये अपग्रेडेशन करण्याच्या संबंधात कामाचा विद्युत सामान्य सेवा भाग. (पुनर्निमंत्रण) **अंदाजे किंमत रु.:** १,१७,७७,४३३.४८/- **बोली सुरक्षा:** २,०८,९००/- **काम पूर्णता कालावधी:** १२ महिने **ऑफरची वैधता:** ६० दिवस **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** १७/०३/२०२६ रोजी १५.०० वाजता. बोली सुरक्षा खर्च **www.ireps.gov.in** वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल. ANJ-18

**सुरक्षित प्रवास करा, पायी प्रवास करणे टाळा.**



**उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी निलंगा यांचे कार्यालय**
**भुसंपादन विभाग**
दुरध्वनी क्र. ०२३८४-२४०६०० Email ID : sdmnilanga@gmail.com

## खरेदीपुर्व जाहिर नोटीस

लातूर जिल्हयातील तमाम जनतेस या प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, कार्यकारी अभियंता लातूर लघुपाटबंधारे विभाग लातूर यांनी मौ. वांजरखेडा ता. शिरुर अनंतपाळ जिल्हा लातूर येथील डोंगरगाव उच्च पातळी बंधारा बुडीत क्षेत्र मौ. वांजरखेडा ता. शिरुर अनंतपाळ येथील अतिरीक्त भुसंपादन कामासाठी मौ. वांजरखेडा ता. शिरुर अनंतपाळ येथील स. नं ४९/अ मधील क्षेत्र ०.७१ हे. आर जमीन थेट खरेदी करण्याबाबत भुसंपादन प्रस्ताव हा नवीन भुसंपादन कायदा २०१३ च्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. संकिर्ण ०१/२०१७/प्र.क्र. १२/अ-२. मंत्रालय मुंबई दि २५/०१/२०१७ मधील तरतुदीनुसार सादर केला आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त जमीन क्षेत्र खाजगी खरेदी व्यवहाराने सार्वजनिक प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्याचे प्रस्तावीत आहे.

खालील अनुसुचीमध्ये संबंधीत जमीन मालकाचे नाव गट नं. स.नं व संपादीत करावयाची क्षेत्र तपशीलवार संयुक्त मोजणी अहवलाप्रमाणे विचारात घेण्यात आलेले आहे. सदर जमीनी बाबत जमीन मालकाचे हिस्सावर हक्क, दत्तकपत्र, वारसाहक्क, गहाण, दान, बोजाबाकी, लिज, कर्ज, बक्षीसपत्र, जप्ती, मादार व इतर हक्क असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन आठ दिवसाच्या आत पुराव्यासह लेखी तक्रार कार्यालयाच्या वेळेत (सकाळी ९.४५ ते सांय ६.१५ वाजेपर्यंत) समक्ष अथवा रजिस्टर्ड पोष्टाने **उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी कार्यालय निलंगा** या कार्यालयास सादर करावी. सदरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरील जमीन मालकाचे मिळकत निर्वेध व निर्जाखमी असल्याचे समजुन **उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी निलंगा.** हे पुढील सरळ खरेदीचा व्यवहार करतील दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आल्यास ती कार्यालायस कायदेशीररीत्या बंधनकारक राहणार नाही याची सर्व तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

सोबत - अनुसुची
दिनांक- ११/०२/२०२६

स्वाक्षरित/-
**(शरद झाडके)**
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भुसंपादन अधिकारी निलंगा**

## अनुसूची

**संपादन संस्थेचे नावः-** **कार्यकारी अभियंता, लातूर लघुपाटबंधारे विभाग लातूर**
**भुसंपादनाचे प्रयोजनः-** **डोंगरगाव उच्च पातळी बंधारा बुडीत क्षेत्र (अतिरीक्त) मौ. वांजरखेडा ता. शिरुर अनंतपाळ**

(**संयुक्त मोजणी** प्रमाणे)

| अ.क्र. | भुधारकाचे नाव | गावाचे नाव | गट/सर्वे नं. | संपादन क्षेत्र हे आर | जिरायत/बागायत |
|---|---|---|---|---|---|
| १ | हक्कानी इकबालपाशा देशमुख | वांजरखेडा ता.शिरूर अनंतपाळ | ४९/अ | ०.७१ | जिरायत |

स्वाक्षरित/-
**(शरद झाडके)**
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भुसंपादन अधिकारी निलंगा**

जिमाका/लातूर/जाहि क्र.५/२०२५-२०२६


## व्यवस्थित ..

असो विषय कुठला
शंका करे उपस्थित
मांडणी रे आकर्षक
पटवून दे व्यवस्थित

असेचं घडले म्हणां
भले असूदे अस्थित
पीपी टी प्रेझेंटेशनने
मुद्दे मांडावे शिस्तीत

प्रत्यक्ष दर्शी कुणीही
नसे ना हो अवस्थित
उभ्या भ्रामकप्रतिमा
रे संभ्रमाच्या वस्तीत

गाजत ठेवावे सवाल
मन शंकासुर उत्थित
ख-या वाटू लागतात
भोंगळ गोष्टी कथित

जनता भावनाविवश
आधीच असे व्यथित
चटकन् ठेवी विश्वास
काहीही सांग ग्रथित

भविष्य कार टपलेले
करे विस्मयी भाकित
चमत्कार प्रिय सर्वांस
आवडे होण्या चकित

सत्य म्हणूं वावरतात
गोष्टी कपोलकल्पित
हळूच साधून घ्यायचे
कार्य भाग संकल्पित

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.


**NAME OF CHANGE DECLARATION**

I HAVE CHANGE MY NAME FROM SHAIKH NASRIN FATIMA HARUN RASHID TO NASRIN AJAGAR ANSARI HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE.NASRIN AJAGAR ANSARI IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.
OLD NAME: SHAIKH NASRIN FATIMA HARUN RASHID
NEW NAME: NASRIN AJAGAR ANSARI
ADDRESS: POLICE STATION ROAD,BAGWAN GALLI,NILANGA,PO ,NILANGA DIST-LATUR (M.S.) 413521

**टी.सी.हरवली आहे.**
शेख खदीर मुनीर या नावाची ३ री पास सिद्धार्थ प्राथमिक शाळा लातूरची टीसी पटेल चौक ते गांधीचौक लातूर ॲटोप्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास कळवावे योग्य बक्षिस दिले जाईल.
-संपर्क:९०२२९६३१२१

**NAME OF CHANGE DECLARATION**
HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS : SHAIKH ALISHAN AFSAR TO SHAIKH ALI AFSAR
HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE . IN FUTURE THE SHAIKH ALI AFSAR WILL USED BY MY FAMILY HUSBAND /WIFE, CHILDREN AND RELATIVE.
OLD NAME :- SHAIKH ALISHAN AFSAR.
NEW NAME:- SHAIKH ALI AFSAR .
ADDRESS :- GAVANFI GALLI, MURUD, TQ. AND DIST. LATUR -413510
AADHAR NO.- 91266196807
MOB. NO.- 7020808556



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६